सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ३१ जानेवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार राष्ट्रपती मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**

संसदेच्याअर्थसंकल्पीय अधिवेशनाची तारीख जाहीर झाली आहे. येत्या ३१ जानेवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. लोकसभा सचिवालयाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाबाबत अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ३१ जानेवारी रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारीला देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील.



अधिसुचनेनुसार, १८ व्या लोकसभेचे चौथे अधिवेशन ३१ जानेवारी २०२५ रोजी सुरू होईल. तर सरकारी कामकाज ४ एप्रिल २०२५ रोजी संपण्याची शक्यता आहे. दरम्यान, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे दोन भाग असणार आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला भाग ३१ जानेवारीला सुरू होईल आणि १३ फेब्रुवारीला संपणार आहे. तर अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा भाग १० मार्चला पासून सुरू होईल आणि ४ एप्रिलला संपणार आहे.

३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या भागात एकूण ९ बैठका होणार आहेत. यामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर देतील. यासोबतच अर्थमंत्री निर्मला सीतारमण अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतील. यानंतर,संसदेचे कामकाज अर्थसंकल्पीय प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी सुरू होईल. त्यानंतर विविध मंत्रालयांकडून अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी आणि अर्थसंकल्पीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संसदेची दुसऱ्या भागात १० मार्चपासून पुन्हा बैठक होईल.

**३० जानेवारीला होणार सर्वपक्षीय बैठक**

संपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशनात २७ बैठका होतील. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ३० जानेवारीला सर्वपक्षीय बैठक बोलावली जाईल. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी याबाबत माहिती दिली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सभागृहात सुरळीत चर्चा होण्यासाठी किरण रिजिजू यांनी विरोधी पक्षांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, अर्थमंत्री निर्मला सीतारमण एक चांगला आणि संतुलित अर्थसंकल्प सादर करतील, अशी आशा केंद्रीय मंत्री रिजिजू यांनी व्यक्त केली आहे.

## वाल्मीक कराडच्या अडचणी वाढल्या महिला पोलिसासोबतचा कॉल रेकॉर्डिंग व्हायरल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८बीड**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मीक कराड याला सीआयडीने अटक केली आहे. या गुन्हात कराड याच्यावर मकोका गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आता वाल्मीक कराड याच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. सध्या सोशल मीडियावर एका महिला पोलिसासोबत कराड याचा कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाला आहे. यामध्ये 'जिल्ह्याचा बाप बसलाय त्या मुलाला सोडून द्या' असं वाल्मीक कराड बोलत असल्याचे दिसत आहे.




सध्या सोशल मीडियावर वाल्मीक कराड आणि महिला पोलीस यांच्यातील कॉलवरील हा संवाद व्हायरल झाला आहे. वाल्मीक कराड आणि बीड येथील सायबर सेलच्या महिला पोलीस अधिकाऱ्यांचा हा कॉल रेकॉर्डिंग असल्याचा दावा करण्यात येत आहे.

वाल्मीक कराड यांनी बीड जिल्ह्यातील सायबर सेलला कॉल केला आहे. यामध्ये समोरून महिला पोलीस अधिकारी बोलत असल्याचे दिसत आहे. व्लामीक कराड सांगत आहेत की,'ताई व्लामीक कराड बोलतो. ते पोर करत आहेत, भैय्या पोस्ट डिलिट करा. त्यांनी आधी सुरुवात केली. आम्ही शांत होतो. इग्नोर करायचं भैय्या, एवढं कशाला मनावर घ्यायच. इथं आम्ही बाप बसलो आहे. मी असल्यावर काय चिंता', असं वाल्मीक कराड बोलत असल्याचे दिसत आहे.

**राजकीय वर्तुळातून टीका**

यामुळे आता राजकीय वर्तुळात आरोप सुरू झाले आहे. यावरुन आता सामाजित कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी टीका केली आहे. दमानिया म्हणाल्या, हा संवाद ऐकला. हे खरच बीड जिल्ह्यातील बाप आहेत. वाल्मीक कराड याने धनंजय मुंडेंच्या वरदहस्ताने जिल्ह्यातील सर्व यंत्रणा एक करुन ठेवली आहे. पोलिसांवरही मोठा दबाव आहे. जिल्ह्याचा कारभार हा पालकमंत्र्याच्या दहशतीखाली चालतो. त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दहशतीखाली सर्व चालते, कोणत्याही परिस्थितीमध्ये धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला पाहिजे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

## बाबा सिद्दिकींच्या डायरीत नाव असणाऱ्या मोहित कंबोज यांचा खुलासा

### विधानांची विपर्यास करून नाव चालवले जात आहे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस नेते बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात त्यांचा मुलगा झिशान सिद्दिकींचा जबाब पोलिसांनी नोंदवला. बाबा सिद्दिकी हे रोज डायरी लिहायचे, त्यात ज्या दिवशी हत्या झाली तेव्हा भाजपा नेते मोहित कंबोज यांच्या नावाचा उल्लेख होता. हे प्रकरण समोर येताच आता त्यावर कंबोज यांनी खुलासा केला आहे. सध्या बातम्यांमध्ये गरमागरम चर्चेसाठी विधानांची विपर्यास करून चालवलं जात आहे. या हत्या प्रकरणाच्या चार्जशीटमध्ये माझे कुठेही नाव नाही असं कंबोज यांनी स्पष्ट सांगितले.

मोहित कंबोज म्हणाले की, झिशान सिद्दिकी यांनी बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचा जो जबाब नोंदवला, त्यात ज्या दिवशी हत्या झाली तेव्हा बाबा सिद्दिकी यांचं माझ्याशी बोलणं झाल्याचं सांगितले. बाबा सिद्दिकी हे माझे १५ वर्ष जुने मित्र आहेत. आम्ही दर आठवड्याला २-४ वेळा बोलायचो. ज्यादिवशी ही घटना झाली ती सर्वांसाठी शॉकिंग होती. संध्याकाळी आमचं बोलणं झाले होते, आम्ही दोघे वांद्रे इथं राहतो. त्यामुळे आमचे चांगले



संबंध होते. त्याशिवाय ते एनडीए घटक पक्षातील अजित पवारांच्या पक्षाचे नेते होते. त्यामुळे त्यांच्याशी बऱ्याचदा आमची राजकीय चर्चा होत होती असं त्यांनी सांगितले.

मात्र झिशान सिद्दिकी यांच्या विधानाचा हवाला देत काही माध्यमे याबाबत उलटसुलट चर्चा करत आहेत. मी याचा निषेध करतो. बाबा सिद्दिकी यांची जी हत्या झाली त्याचं सत्य बाहेर यायला हवे. यातील दोषींना कठोर शिक्षा मिळायला हवी. मुंबई पोलिसांना या हत्येमागेचं सत्य काय आहे ते लोकांसमोर लवकरात लवकर आणायला पाहिजे अशी मागणी मोहित कंबोज यांनी केली.

**झिशान सिद्दिकींनी काय म्हटलं होतं?**

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात मुंबई पोलिसांनी माजी आमदार झिशान सिद्दीकी यांचा जबाब नोंदवला. त्यात त्यांनी बाबा सिद्दिकींच्या डायरीचा उल्लेख करत खळबळजनक खुलासे केले होते. दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील बाबा सिद्दिकी यांना डायरी लिहायची सवय होती. वांद्रे परिसरातील अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांच्या कामासाठी ते उभे होते. त्यांचं हे काम करताना काही मोठ्या बिल्डर्ससोबत वाद झाला होता. त्यांनी डायरीत सगळ्या बिल्डर्सची नावे लिहून ठेवली आहेत असे झिशान यांनी पोलिसांना सांगितले होते. ज्यादिवशी बाबा सिद्दिकींची हत्या झाली. त्याच दिवशी त्यांनी डायरीत एक शेवटचे नाव लिहिले होते, ते नाव मोहित कंबोज यांचं आहे. माझ्या वडिलांचे मोहित कंबोज यांच्यासोबत व्हाट्सअपवर संभाषण झाले होते. संध्याकाळी साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास दोघांमध्ये बोलणं झालं होतं. पण, मोहित कंबोज यांचं नाव का लिहिलं, हे मी सांगू शकत नाही असं झिशाने सांगितले होते.

## मराठी चित्रपटांना मिळणार 'बूस्टर'; राज्य सरकारकडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चित्रपट महोत्सवाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

मराठी चित्रपट क्षेत्राला बळ देण्यासाठी यावर्षीपासून राज्य शासन आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आज पत्रकार परिषदेत केली. त्याचबरोबर साठाव्या राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकने आणि तांत्रिक व बालकलाकार विभागातले पुरस्कार जाहीर करण्यात आले.




गेल्या ६० वर्षापासून राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येतो. मात्र शासनाचा अधिकृत असा चित्रपट महोत्सव आयोजित केला जात नाही. राज्यात विविध ठिकाणी विविध संस्थांच्या मार्फत आंतरराष्ट्रीय चित्रपटांचे आयोजन केले जाते. अशा संस्थांना १० लाखापासून ४ कोटीपर्यंत शासन अर्थसहाय्य करते. मात्र शासनाचा अधिकृत असा महोत्सव नसल्याने यावर्षीपासून मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्याची संकल्पना या खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर ॲड.आशिष शेलार यांनी मांडली, त्याला आता मुहूर्त स्वरूप आले आहे.यावर्षीचा हा पहिला चित्रपट महोत्सव मुंबईत होणार असून तीन दिवसांचा हा महोत्सव असेल. जे मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचत नाहीत असे चित्रपट या महोत्सवात दाखविण्यात येतील. प्रत्येक चित्रपटा सोबत त्या चित्रपटाची टीम उपस्थित असेल जी थेट दर्शकांशी संवाद साधेल, या निमित्त काही विशेष परिसंवाद व या विषयातील अभ्यासकांच्या मुलाखती अशा आंतरराष्ट्रीय मानकांच्या स्वरूपात राज्याचा मराठी चित्रपट महोत्सव केला जाणार आहे. याबाबतच्या तारखा व नियमनियमावली लवकरच जाहीर करण्यात येतील. या महोत्सवात दर्जेदार मराठी चित्रपटांचा आस्वाद चित्रपट रसिकांना मिळणार आहे. याबाबतची अमलबजावणी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

## 'स्वत:च्या हातानेच असली चेहरा जगासमोर आणला'; आशिष शेलारांनी उद्धव ठाकरेंना घेरले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई ३१**

राज्यात महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीने वेग घेतलेला असतानाच भाजपला ठाकरेंच्या विरोधात आयता मुद्दा मिळाला आहे. केंद्र सरकारने जेपीसीकडे पाठवलेले वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक संयुक्त संसदीय समितीने मंजूर केले. पण, ठाकरेंच्या शिवसेनेचे




खासदार अरविंद सावंत यांनी विधेयकाविरोधात मतदान केले. त्यावरूनच कॅबिनेट मंत्री आणि भाजपचे नेते आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला घेरले आहे.

विरोधात मतदान केल्याच्या मुद्द्यावर बोट ठेवत भाजप नेते आशिष शेलार म्हणाले, वक्फ कायदा सुधारणेला विरोध करुन उबाठाने आपल्या चेहऱ्यावरचा 'हिजाब'स्वत:च्या हातानेच टराटरा फाडला आणि उबाठा गटाचा असली चेहरा जगासमोर आणला.

उबाठा गटाचे खासदार अरविंद सावंत आणि असदुद्दीन ओवेसी यांनी 'एकत्रित' मतदान केले. देशाच्या राजकीय इतिहासात ही काळ्या शाईने लिहावी अशी घटना आहे. श्रीमान उद्धव ठाकरे, यालाच हिंदूंच्या पाठीत 'खंजीर' खुपसणे असे म्हणतात. तुमचा कार्यक्रम जोरात चालू ठेवा. हिंदुला अडवा आणि औरंगजेब फॅन क्लब वाढवा, असे म्हणत आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांची हिंदूत्वाच्या मुद्द्यावरून कोंडी केली आहे.

## नागपुरात होणाऱ्या भारत वि. इंग्लंड सामना, तिकिटांची विक्री २ फेब्रुवारी पासून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर**

विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर तब्बल सहा वर्षानंतर एकदिवसीय सामन्याचे आयोजन केले जाणार आहे. येत्या ६ फेब्रुवारी रोजी हा बहुप्रतिक्षित सामना भारत विरुद्ध इंग्लंड संघादरम्यान होणार आहे. तीन सामन्याच्या या शृंखलेतील पहिलाच सामना नागपूरमध्ये होणार असल्याने क्रिकेट चाहत्यांमध्ये चांगलाच उत्साह आहे. इंग्लंड संघाविरोधातील इतर दोन सामने ९ फेब्रुवारीला कटकमध्ये तर १२ फेब्रुवारीला अहमदाबाद येथे होणार आहे.



नागपूरमध्ये होणाऱ्या पहिल्या सामन्यासाठी व्हीसीएद्वारा तिकिटविक्रीचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

प्रत्येक सदस्याला चार तिकिटे विकत घेण्याची संधी देखील उपलब्ध राहणार आहे. सदस्यांना तिकिटविक्री झाल्यावर २ फेब्रुवारीपासून सामान्य लोकांना तिकिट विकली जातील. सकाळी १० वाजतापासून डिस्ट्रिक्ट पच्या माध्यमातून लोकांना तिकिटे घेता येतील. प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त दोन तिकिट घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. ऑनलाईन तिकिट घेतल्यावर लोकांना ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान प्रत्यक्ष तिकिट घ्यावे लागेल. व्हीसीएच्या सिव्हिल लाईन्स येथील मैदानावर ३ ते ५ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ९.३० ते रात्री ८.३० दरम्यान चाहत्यांना तिकिट घ्यावे लागेल. ६ फेब्रुवारी रोजी सामन्याच्या दिवशी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत ही सुविधा उपलब्ध राहील. यंदाही शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच अनाथ मुलांसाठी व्हीसीएमार्फत तिकिट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

भारत विरुद्ध इंग्लंड सामना ६ फेब्रुवारी दुपारी दीड वाजल्यापासून व्हीसीएच्या जामठा मैदानावर खेळविला जाईल. या मैदानाची क्षमता सुमारे ४४ हजार लोकांची आहे. या मैदानावर अंतिम सामना २०१९ मध्ये ऑस्ट्रेलिया संघाविरोधात खेळविण्यात आला होता. जामठाच्या मैदानावरील हा आतापर्यंतचा नववा एकदिवसीय सामना असेल तर नागपूरमधला एकूण २३ वा एकदिवसीय सामना राहील. ६ फेब्रुवारी होणाऱ्या सामन्यासाठी तीन फेब्रुवारीला दोन्ही संघ नागपूरमध्ये येतील.

## ठाकरेंना धक्का! अहिल्यानगरचे पदाधिकारी करणार जय महाराष्ट्र; मुहूर्तही ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अहिल्यानगर**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेलं यश पाहता ठाकरे गटात इन्कमनिंग झाले होते. मात्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या पडझडीनंतर आता त्याचे परिणाम थेट गावपातळीवर दिसून येत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील ठाकरे गटाचे पदाधिकारी ठाकरेंची मशाल खाली ठेवत थेट शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेत एकनाथ शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. यामुळे नगर जिल्ह्यात ठाकरे गटाला मोठं खिंडार पडणार आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक डोळ्यांसमोर ठेवत आता राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. कार्यकर्ते व पदाधिकारी यांची समजूत काढण्यासाठी ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांची नगरमध्ये कार्यकर्त्यांसोबत चर्चा झाल्याचे समजते. मात्र नाराज झालेल्या शिवसैनिकांनी आपले राजकीय अस्तित्व अबाधित राहावे यासाठी येत्या उद्या बुधवारी (२९ जानेवारी) शिंदे गटामध्ये प्रवेश करणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## संपादकीय ......

# पगारवाढीचा दिलासा, डाळींचा खुलासा

नवीन वर्ष भारतीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची भेट घेऊन आले आहे. एका नवीन अहवालानुसार, २०२५ मध्ये देशातील अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कामगारांची मोठी वाढ होईल. 'मर्सर' या 'एचआर कन्सल्टिंग फर्मने एकूण मोबदल्याच्या सर्वेक्षणावर आधारित एक अहवाल तयार केला. गेल्या ५ वर्षांमध्ये भारतातील कर्मचाऱ्यांच्या पगारात सातत्याने वाढ झाल्याचे आढळून आले. २०२० मध्ये ८ टक्के असलेली पगारवाढ २०२५ मध्ये ९.४ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अहवालानुसार, सर्व क्षेत्रांमध्ये ९.४ टक्क्यांपर्यंत होऊ घातलेली पगारवाढ देशाच्या मजबूत आर्थिक वाढीचे आणि कुशल प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या यादीमध्ये ऑटोमोटिव्ह क्षेत्राला आघाडीवर ठेवण्यात आले आहे. या क्षेत्रात, पगारवाढ ८.८ ते १० टक्क्यांदरम्यान असण्याचा अंदाज आहे. याचे श्रेय देशातील इलेक्ट्रिक वाहनांची वाढती मागणी आणि भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाला जाते. उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्र या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनामध्ये ८ ते ९.७ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, जी उत्पादन परिसंस्थेच्या वाढीचे प्रतिबिंब आहे. सर्वेक्षणामध्ये १,५५० कंपन्यांनी भाग घेतला. 'मर्सर'च्या या सर्वेक्षणात देशातील विविध क्षेत्रांतील १,५५० हून अधिक कंपन्यांनी भाग घेतला. त्यात तंत्रज्ञान, जीवन विज्ञान, वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, उत्पादन आणि ऑटोमोटिव्ह क्षेत्रांचा समावेश आहे.

अहवालात असेही दिसून आले आहे की, ३७ टक्के संस्था २०२५ मध्ये आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची योजना आखत आहेत, जे देशभरातील प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या कालावधीत, कंपन्यांमधील टाळेबंदीदेखील ११.९ टक्क्यांवर स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. 'मर्सर इंडिया'च्या करिअर लीडर मानसी सिंघल म्हणाल्या की, देशातील प्रतिभा क्षेत्र बदलाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यातून जात आहे. ७५ टक्के संस्थांमध्ये चांगल्या कामावर आधारित वेतन योजना स्वीकारली जात आहे. यामुळे या स्पर्धात्मक बाजारपेठेत, कंपन्या प्रतिभा आकर्षित करण्याच्या आणि टिकवून ठेवण्याच्या ट्रेंडला प्राधान्य देत आहेत. आता एक दखलपात्र बातमी. सोन्याच्या बाजारपेठेत पुन्हा तेजी येऊ लागली आहे. नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी अशुभ मानल्या जाणाऱ्या खरमासाच्या समाप्तीनंतर, मकर संक्रांतीपासून सुरू झालेला शुभमुहूर्त परत येताच, सोने खरेदीदार आणि गुंतवणूकदारांनी पुन्हा सोने खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे लग्नाचा हंगाम जवळ येत आहे. सोन्याची खरेदी वाढल्याने किमतीही वाढू लागल्या आहेत. सराफा बाजारात सोन्याचा भाव ५०० रुपयांनी वाढून ८१,३०० रुपये प्रतितोळा झाला. तो दोन महिन्यांमधील उच्चांक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याचे भाव वाढत असून २,७३७.५० डॉलर प्रति औंस दरावर पोहोचले आहे. १२ डिसेंबर २०२४ नंतरची ती सर्वोच्च पातळी आहे. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव आणखी वाढू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. जागतिक आर्थिक अस्थिरतेमुळे सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्यातील गुंतवणूक वाढू शकते. चांदीच्या किमतीही वाढत आहेत. चांदीचा दरही २,३०० रुपयांनी वाढून ९४,००० रुपये प्रति किलो झाला आहे. 'एलकेपी सिक्युरिटीज'चे उपाध्यक्ष जतीन त्रिवेदी म्हणाले की, अपेक्षेपेक्षा कमी महागाई दरामुळे सोन्याच्या किमतींना आधार मिळाला आहे. चलनवाढीचा दर कमी झाल्यामुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची दरकपात करत राहील, अशी अपेक्षा बळावली आहे. त्यामुळे सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे. सोने खरेदी वाढण्याचे कारण म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये सरकार सोन्यावरील आयात शुल्क वाढवू शकते. व्यापार तूट कमी करण्यासाठी २३ जुलै २०२४ रोजी अर्थसंकल्पात १५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलेले आयात शुल्क वाढवले जाण्याची शक्यता आहे. नवीन वर्षात सोने आणि चांदीचा झोका उंच आकाशी पोहोचला. २०२५ च्या बजेटपूर्वीच दोन्ही धातूंचा आलेख उंचावला आहे. सोन्यासोबत या वेळी चांदीने गरूडभरारी घेतली आहे. गेल्या पंधरवड्यात किमती धातूंनी खरेदीदारांची झोप उडवली. अनेकांच्या खिशावर संक्रांत आली, तर या आठवड्याच्या अखेरीस दोन्ही धातूंनी जोरदार मुसंडी मारली. या आठवड्यात सोन्याने जोरदार मुसंडी मारली. एका आठवड्यात सोने १७३० रुपयांनी महागले. 'गुड रिटर्न्स'नुसार, आता २२ कॅरेट सोने प्रति दहा ग्रॅम ७४,६५० रुपये, तर २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅमसाठी ८१,४२० रुपये आहे. या महिन्यात चांदीने मोठी भरारी घेतली. 'गुड रिटर्न्स'नुसार, एक किलो चांदीचा भाव ९६ हजार ५०० रुपये इतका आहे.

गेल्या तीन-चार वर्षांमध्ये कडधान्यापासून अन्नधान्यापर्यंत सर्वच घटकांचे दर महागले आहेत. तुरीचे भाव गडगडल्याने आता तूरडाळ स्वस्त होण्याची शक्यता आहे. इतर डाळींच्या किमतीही कमी होण्याची शक्यता आहे. सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीचे दर घसरले आहेत. ते साडेतेरा हजार रुपये प्रति क्विंटल इतके झाले आहेत. त्यामुळे आता तूरडाळीचे दरदेखील कमी होत आहेत. ते सुमारे ४० रुपयांनी कमी झाले आहेत. यामुळे तूरडाळीचे गगनाला भिडलेले दर आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात येणार आहेत. मोठ्या प्रमाणात उत्पादनाच्या शक्यतेने सांगलीतील ठोक बाजारात तूरडाळीचे दर किलोमागे ४० रुपयांनी उतरले आहेत.

तूरडाळीचे दर कमी होऊ लागताच मूग, मसूर आणि हरभरा डाळीचे दरही उतरले आहेत.मसूरडाळीचे दर किलोला ९० रुपयांवर स्थिर असले तरी मूगडाळीचे दर मात्र किलोला १० ते १५ रुपये उतरले आहेत. नवीन हंगामातील तुरीची अद्याप बाजारात आवक झालेली नाही. या वर्षी चांगला पाऊस झाल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या प्रांतात तुरीचे विक्रमी पीक आले आहे. देशांतर्गत तुरीची मागणी ४२ लाख टनांची आहे. यंदा देशांतर्गतच तेवढे उत्पादन होण्याची शक्यता आहे. शिवाय बाहेरील देशांमधून सुमारे १० लाख टन तूर आयातीचे करार झालेले आहेत. यामुळे तुरीचा साठा हा मागणीपेक्षा जास्तीचा होणार आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेज येथे मराठी भाषा रोजगाराच्या संधी विषयावर कार्यक्रम

## मॉडेल डिग्री कॉलेज व मराठी भाषा संचालनालय यांचा संयुक्त उपक्रम



**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-**

मराठी भाषा केवळ महाराष्ट्राची न राहता ती देशभरातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेली असून वेगवेगळ्या संध्या त्या निमित्ताने उपलब्ध झालेले आहेत, त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यायला पाहिजे म्हणजेच साहित्यिक आनंदाचा लाभ घेतानाच जीवन जगण्यासाठीची शिदोरी देखील भावी आयुष्यात निर्माण करता येईल, असे प्रतिपादन श्री रमेश इंगळे यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या सभागृहात महाराष्ट्र राज्य भाषा संचालनायाच्या वतीने मराठी भाषा: रोजगाराच्या संधी या विषयावर नुकताच कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ अण्णासाहेब म्हळसने, प्रमुख वक्ते म्हणून निशाणी डावा अंगठा कादंबरीचे लेखक प्रख्यात साहित्यिक रमेश इंगळे, प्रा. डॉ. सदानंद देशमुख, महाराष्ट्र शासनाच्यावतीने श्री नामदेव कोळी, संदीप घोंगडे उपस्थित होते.

१४ ते २८ जानेवारी दरम्यान पंधरवड्यात ३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रे हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रत्येक जिल्ह्यात साजरा करण्यात आला. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ अण्णासाहेब म्हळसणे यांनी हे व्यासपीठ म्हणजे पुढील आयुष्यासाठीची शिदोरी असून त्यातून होणारी वैचारिक पायाभरणी यशस्वी जीवनाच्या वाटचालीची नांदी ठरेल, विद्यार्थ्यांनी त्याचा डोळस दृष्टिकोनातून विचार करायला पाहिजे, असे सांगितले. महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी श्री नामदेव कोळी यांनी देखील याप्रसंगी विद्यार्थ्यांना आयुष्यात भाषेचे महत्त्व समजावून सांगितले. याप्रसंगी प्रथम साहित्य शिरोमणी विवा शिरवाडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. विद्यापीठ गीत आणि स्वागत गीतानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रास्ताविक श्री संदीप घोंगडे यांनी, पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. किसन वाघ यांनी करून दिला. संचालन प्रा. डॉ. मनीषा राऊत, तर आभार प्रा. दिलीप माने यांनी मांनले. कार्यक्रमाला शहरातील बहुसंख्येने साहित्यिक, साहित्यप्रेमी राजकीय मान्यवर, महाविद्यालयाचे प्राध्यापक, आणि मोठ्या संख्येत विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# शेतकऱ्यांनो उन्हाळी बाजरीचे तंत्र जाणून घ्या सविस्तर




**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रात खानदेश, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागात उन्हाळी बाजरी घेतली जाते. या काळात उन्हाळ्यात हवामान कोरडे असल्याने अरगट, गोसावी, तांबेरा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो.

त्यामुळे धान्य व चाऱ्याची गुणवत्ता चांगली मिळते. तसेच संरक्षित पाण्याची सोय असल्यास शेतकऱ्यांच्या फायद्यात वाढ होते. त्यामुळे शेतकरी उन्हाळी बाजरी लागवडीला अधिक पसंती देतात.

सर्वत्र पीक सध्या जोमात आले आहे. या पिकाला पाणी कमी लागते. त्यामुळे ठिबक सिंचनामुळे पीक चांगलेच बहरले आहे. मागील वर्षी उन्हाळी बाजरीला ज्वारी व गव्हापेक्षा जास्तीचा भाव मिळाला होता. त्यामुळे या पिकाकडे मोठा कल वाढल्याचे दिसून येत आहे.

उन्हाळी बाजरी पीक पिवळदार निघते. भाकरी देखील चटकदार असते. त्यामुळे आरोग्यासाठी देखील चांगली असते. त्यामुळे बाजारात मागणी वाढलेली आहे. सध्या बाजरी पिकाचे तण काढण्याचे काम सुरू असून अनेक महिलांना यातून रोजगार उपलब्ध झालेला आहे.

पीक कापणीची तपासणी

* हातात कणीस घेतले असता त्यातून दाणे सुटणे तसेच दाताखाली दाणा चावल्यानंतर कट्ट असा आवाज आल्यास पीक कापणीस योग्य आहे असे समजावे.

* ताटाची कणसे विळ्याने कापून गोळा करुन वाळवून यंत्राने मळणी करावी. त्यानंतर धान्य पोत्या भरावे.

५ ते ६ पाणीपाळी आवश्यक

* उन्हाळी बाजरी पिकास ३५ ते ४० सें. मी. पाण्याची गरज असते. पेरणीनंतर ४ दिवसांनी हलके पाणी द्यावे. त्यानंतर जमिनीच्या मगदुरानुसार १० ते १२ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्या.

* पाण्याची उपलब्धता असल्यास संवेदनक्षम अवस्थेत पाणी दिल्यास अधिक उत्पादन मिळू शकते. पहिले पाणी फुटवे येण्याच्या वेळी (पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी), दुसरे पाणी पीक पोटरीत असताना (पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी) आणि तिसरे पाणी दाणे भरते वेळी (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी) द्यावे.




* बाजरी पिकांसाठी दहा ते बारा दिवसांच्या अंतराने ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्या लागतात. त्यानंतर पीक काढणीस येते.

आंतरमशागत व तण नियंत्रण गरजेचे

* तणांचा बंदोबस्त करण्यासाठी २ वेळा कोळपणी आणि गरजेनुसार एक ते दोन वेळा खुरपणी करावी. पेरणी केल्यापासून सुरुवातीचे ३० दिवस शेत तण विरहीत ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

* कारण याच कालावधीत तण व पीक यांच्यात हवा, पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश मिळविण्यासाठी स्पर्धा होत असते किंवा एकात्मिक तण नियंत्रण पद्धतीमध्ये ट्राझिन तणनाशकाची १.० किलो प्रति हेक्टरी पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी ५०० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी व एक खुरपणी पेरणीनंतर २५-३० दिवसांच्या आत करावी.




# हिवाळ्यात का खावा पेरु? काय आहेत फायदे

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यात अनेकजण पेरूचे सेवन मोठ्या आवडीने करतात. या काळात लाल पेरूही उपलब्ध असतो. पेरूचे अनेक फायदे आहेत. विशेष म्हणजे पेरूमुळे पचनक्रिया सुधारते तसेच बद्धकोष्ठतेची संबंधित समस्या दूर होतात, वजन नियंत्रणात राहते.

असे अनेक फायदे असलेले पेरू फळ हिवाळ्यात नक्की खावे, असा सल्ला तज्ज्ञ देतात. पेरूचे सेवन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्वचा सोलून कच्चा खाणे. त्याचा रस काढणे किंवा चहा बनवण्यासाठी पाने उकळणे, पेरूमध्ये कॅलरीज कमी असल्या तरी त्यात नैसर्गिक शर्करा असते.

जास्त प्रमाणात सेवन केल्यास रक्तातील ग्लुकोजवर परिणाम होऊ शकतो, आहारात पेरुचा समावेश करणे मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यासाठी एक चवदार आणि पौष्टिक पर्याय ठरू शकतो.

तथापि, तो एकंदरीत संतुलित आहार आणि जीवनशैलीचा भाग असावा, असे तज्ज्ञ सांगतात, राज्यात कोणत्याही भागात पेरू सद्या सहज उपलब्ध होत आहेत. त्यामुळे त्याचा आहारात वापर वाढवणे गरजेचे आहे.

पचनशक्ती वाढते, वजन उतरते

मधुमेही रुग्णांसाठी पेरूचे सेवन करण्याचे एक कारण म्हणजे ते वजन नियंत्रणात मदत करते. पेरूची कॅलरी संख्या कमी आहे.

सुमारे ६८ किलो कॅलरी प्रति १०० ग्रॅम आहारात पेरूचा समावेश करून, पोषक तत्वांचा निरोगी संतुलन तयार करू शकता जे वजन कमी करण्यास मदत करतात.

संत्र्यापेक्षा जास्त 'व्हिटॅमिन सी'

पेरूमध्ये अनेक गुणधर्म आहेत. यात भरपूर प्रमाणात मॅग्नेशियम असते. ज्यामुळे स्नायूंच्या दुखण्यापासून आराम मिळतो.

पेरूत फायबरचे प्रमाण चांगले असते त्यामुळे त्याचे सेवन केल्याने वजन वाढण्यापासून रोखले जाते.


हिवाळ्यात पेरू का खावा?

मधुमेहाच्या रुग्णांसाठी पेरू हा उत्तम स्त्रोत

१२ ते २४ च्या कमी ग्लायसेमिक इंडेक्ससह पेरु हा मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी सुरक्षित आणि हळू उर्जेचा स्त्रोत आहे.

पेरू हे विविध आरोग्य फायद्यांमुळे मधुमेही लोकांच्या आहारात एक मौल्यवान जोड असू शकते

पेरू भाजून खाल्ल्यास श्वसनशक्ती सुधारते

पेरूमध्ये फायबर्स असतात. जे अन्न पचायला मदत करतात. मात्र हाच पेरू भाजून खाल्ल्याने पेरूतील फायबर्स आणि पोषकतत्त्व जास्त चांगल्या पद्धतीने अन्न पचायला मदत करतात.

भाजलेला पेरू जर काव्या मिठासोबत खाल्ला तर हे आणखी फायद्याचं ठरू शकतं.

# दर्यापूर वसतिगृहात संविधानाबाबत विविध स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दर्यापूर येथील शासकीय वसतिगृहात विविध स्पर्धा पार पडल्या. घर घर संविधान अभियानांतर्गत दर्यापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह आणि १२५वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह येथे भारतीय संविधानावर आधारीत निबंध, चित्रकला, वक्तृत्व आणि देशभक्तीपर आधारीत गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.

# दिव्यांग व्यक्तींनी फिरत्या वाहनावरील दुकान

## योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

दिव्यांग व्यक्तींच्या सबळीकरणासाठी फिरत्या वाहनावरील दुकान मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हरीत ऊर्जेवर चालणारे फिरत्या वाहनावरील दुकान योजनेची अंमलबजावणीची दिव्यांग वित्त व विकास महामंडळ करणार आहे. योजनेतून दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांचा परिवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ राज्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी िशसळींशी.ीहषवल.ले.ळप पोर्टलवर ६ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी लागणार आहे. या योजनेचा लाभ दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


## उद्धव ठाकरे येत्या काळात मुख्यमंत्री फडणवीस आणि पंतप्रधान मोदी यांचे नेतृत्व स्वीकारतील

## आमदार रवी राणा यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. संजय राऊत यांना कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असा टोला रवी राणा यांनी लगावला आहे. उद्धव ठाकरे येत्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारतील, असा खळबळजनक दावाही रवी राणा यांनी केला.विधानसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर ठाकरे गटाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. यावरुनच ठाकरे भाजपच्या जवळ येण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा केला जातोय. आदित्य ठाकरे यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांची तीन वेळा भेट घेतली होती. यावरुनच जोरदार चर्चा सुरु झाली. आता भाजच्या मित्रपक्षाने मोठा दावा केल्यानंतर सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.



### ■ राणा यांची जे.पी. नड्डा यांच्या जागी नेमणूक केली आहे का ?: राऊत

रवी राणा यांच्या दाव्यावर संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. रवी राणा यांची जे पी नड्डा यांच्या जागी नेमणूक केली आहे का ? असा सवाल राऊत यांनी केला आहे. शिवसेना हा एक स्वतंत्र पक्ष आहे. शिवसेनेला एक परंपरा आहे. जेव्हा हा पक्ष स्थापन झाला तेव्हा ज्या व्यक्तीचे तुम्ही नाव घेतले त्यांचा जन्मही झाला नव्हता. असे संजय राऊत म्हणाले.

उद्धव ठाकरे यांची देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात छुपी रणनीती सुरू आहे. पण संजय राऊत यांना त्याची कल्पना नाही. ते आधी सुद्धा अंधारात होते आणि आता सुद्धा ते अंधारात आहेत, असे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील नेतृत्व उद्धव ठाकरे येणाऱ्या काळात स्वीकारणार आहेत. त्या दृष्टीने त्यांचे पाऊल टाकणे सुरु असल्याचा दावा रवीराणा यांनी केला. उद्धव ठाकरे जेव्हा भाजपसोबत दिसतील, त्यावेळी संजय राऊतांना मोठा झटका बसेल, असेही ते म्हणाले.

# अमरावती बाजार समितीत ई-निविदा, स्वच्छता कंत्राटामध्ये घोळ !

## जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या चौकशी अहवालात ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** बाजार समितीमधील विविध ४४ लाखांच्या कामांची ई निविदा न काढता नियमबाह्य कामे देणे व स्वच्छता कंत्राटाची नियमबाह्य मुदतवाढ आणि वाढीव दराने कंत्राट देणे आदी मुद्यांवरून सभापती, उपसभापती, सचिव व अन्य संचालक मंडळाविरोधात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने केलेल्या चौकशीमध्ये अनेक ताशेरे ओढले आहेत.




अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधकांनी तालुका उपनिबंधक सचिन पतंगे, लेखा परिक्षक सुशिल ठोक यांची चौकशी समिती गठीत केली होती. बाजार समितीमध्ये प्रशासकीय मान्यतेनूसार ४४ लाखांची कामे व तीन विद्युत कामांना मान्यता देण्यात आली होती. या कामांची ई निविदा काढणे क्रमप्राप्त होते. मात्र नियमबाह्य पध्दतीने ही कामे कंत्राटदारांना दिल्याचा आरोप तक्रारीतूनकरण्यात आला होता. चौकशीत या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात चुका असल्याचेही आढळून आले आहे. संचालक मंडळाची मंजुरी आदेशाला मंजुरात नाही, जाहीरात प्रसिध्दी पत्रामध्ये खोडतोड, निविदा प्रक्रियेत कायदेविसंगत बाबी असल्याचा ठपका, कंत्राटदारांना अॅडव्हास देतांना अनेक प्रकारच्या चुका आढळून आल्याने यामध्ये गैरव्यवहार दिसून येत असल्याचाही ठपका बाजार समितीवर ठेवण्यात आला आहे.स्वच्छता कंत्राटमध्ये देखील घोळ झाल्याचा आरोप करण्यात आला होता. चौकशीमध्ये मे. स्वराज सुशिक्षित बरोजगार संस्थेचा स्वच्छता कंत्राट संपुष्टात आला असताना त्यांना कंत्राट संपण्यापूर्वी पुर्वनियोजित तयारी न करणे व त्याला मुदतवाढ देऊन १५ टक्के दरवाढवून कंत्राट देण्यात आल्याचे चौकशी अहवालात नमुद आहे. शेखर औघड, राहूल तायडे आणि उमेश महिंगे यांनी तक्रार दिली होती. त्यांनी मागितलेली माहीती त्यांना पुरविण्याचे आदेश देखील या अनुषंगाने देण्यात आले आहे.

■ वार्षिक पंधराशे कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत शासकीय तसेच शेतकऱ्यांच्या निधीचा दुरुपयोग करून आर्थिक डल्ला मारला जात आहे. बाजार समितीतील कंत्राट, निविदा, भंगार रद्दी, मातेराविक्री, बांधकाम, वसुल केला जाणारा सेस, गैर मागनि वाटप केलेले कंत्राट, दुकाने/परवाने, सुरक्षा कंत्राट, कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्त्या, शेतकऱ्यांच्या नावावर घेतले जाणारे राजकीय मेळावे आदी अनेक तक्रारी शासन दरबारी आहेत. बाजार समितीचा यापेक्षा मोठ्ठा भ्रष्टाचार उघड होऊन समिती बरखास्तीबाबत व अपहारीत रकमेच्या वसुलीसह कार्यवाहीकारिता जोर धरून जिल्हा शेतकरी संघर्ष समितिची कठोर भूमिका असणार आहे.

**शेखर कृ. औगड,**सचिव, जिल्हा शेतकरी संघर्ष समिती अमरावती.

# जेवणात मीठ जसे चवीनुसार वापरले जाते तसे राजकारणात महापुरुषांच्या विचारांचे झाले

### जेष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी व्यक्त केली खंत

## जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

### राज्य ,विभाग व् जिल्हास्तरीय पुरस्काराचे वितरण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती–** महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्याच्या वाटचालीचा विचार केला तर १९७० नंतर अचानक महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा झाल्याचे आपल्या लक्षात येईल, पण आंबेडकर म्हणायचं, महापुरुषांचे नाव घ्यायचं, मात्र त्यांचे विचार अंगीकारणे तर दूरच आपण ते वाचले तरी आहे काय? समजून तरी घेतलेत काय? हे तपासण्याची गरज आहे. फुले-शाहू-आंबेडकर हा विचार आहे. पण आज दुर्दैवाने विचार बाजूला पडला आणि त्याचा अजेंडा झालेला जेवणात मीठ जसे चवीनुसार वापरले जाते तसे राजकारणात या महापुरुषांच्या विचारांचे झाले आहे. राजकारण्यांकडून फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांसोबतच त्यांच्या नावाचाही केवळ स्वार्थासाठी वापर केला जात आहे. अशी खंत ज्येष्ठ पत्रकार आणि स्तंभलेखक व वक्ते भाऊ तोरसेकर यांनी व्यक्त केली.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने भाऊ तोरसेकर यांचा राज्यस्तरिय जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. हव्याप्र मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना भाऊ तोरसेकर बोलत होते. त्यांना स्व. दादासाहेब काळमेघ जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ४१ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पूरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री बच्चू कडू आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ मंचावर उपस्थित होते. या समारंभात दै. लोकमतच्या नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने यांना स्व. जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरिय पत्रकारिता पूरस्कार प्रदान करण्यात आला. ३१ हजार रुपये रोख व स्मृतीचिन्ह असे पूरस्काराचे स्वरूप होते. दै. भास्करच्या उपसंपादक सौ. गीता तिवारी यांना राहुल गडपाले यांनी पुरस्कृत केलेल्या विभागीय पत्रकारिता पूरस्काराने गौरवान्वित करण्यात आले. दै. सकाळचे जिल्हा प्रतिनिधी सुरेंद्र चापोरकर यांना दै. विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरिय (शहर) आणि धामणगाव रेल्वे येथील प्रतिनिधी मंगेश भुजबळ यांना दै. जनमाध्यम पुरस्कृत जिल्हास्तरिय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार प्रदान करण्यात आला. या दोन्ही पूरस्कारांचे स्वरुप ११ हजार रुपये रोख व स्मृतीचिन्ह असे होते.

भाउ तोरसेकर म्हणाले की, आज पत्रकारांनी सत्ताधाऱ्यांना प्रश्नविचारले पाहीजे. पण स्वतःला जाणकार महापुरुषांच्या विचारांचा राजकारण्यांकडून अजेंड्याप्रमाणे वापर... म्हणवून घेणारे पत्रकार त्यात कमी पडत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा प्रशंसक आहे, पण त्यांनी दावोसवरुन गुंतवणूक आणल्यानंतर त्यांच्यासमोर प्रश्न उभे केले आहेत. आज महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुक्यात वाल्मिक कराडसारखे खंडणीखोर आहेत. ते उद्योजकांना त्रास देतात. त्यांचे अस्तित्व कायम राहीले, तर जेवढी गुंतवणूक आणली जाईल, ती अशा गुंडांमुळे परत गेल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अशा प्रवृत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी सरकार काय करणार आहे, असा सवाल आपण मुख्यमंत्र्यांसमोर उपस्थित केल्याचे तोरसेकर म्हणाले. भाऊ तोरसेकर यांनी ईव्हीएमवर विरोधकांकडून उपस्थित केल्या जात असलेल्या शंकेवरही भाष्य केले. ते म्हणाले, मतदानासाठी कोणतीही पद्धत आणली तरी ज्यांना तक्रार करायची आहे, ती ते करणारच, इतिहास हेच सांगतो. ५३ वर्षांपूर्वी इंदिरा गांधींना प्रचंड बहुमत मिळाले तेव्हाही हा विजय बाईचा किंवा गाईचा नसून शाईचा विजय आहे, अशी टीका करुन निवडणूक पद्धतीवर आक्षेप घेण्यात आला होता. त्या काळात ईव्हीएम नसतांना मतपत्रिका, मतपेट्या पळविल्याचे आरोप केले जायचे. त्यामुळे या आक्षेपांना काहीच अर्थ नाही. तुम्ही एकदा मॅच खेळायला उतरले आणि पंचाचा निर्णय तुमच्या विरोधात असला, तुम्हाला पटण्यासारखा नसला तरी तो मान्य केलाच पाहीजे. तुम्ही जेव्हा ईव्हीएमवर शंका घेता तेव्हा तुम्ही मतदारावर शंका घेता आणि जेव्हा मतदारावर शंका घेता तेव्हा तुम्ही लोकशाहीवर शंका घेत असता, मतदानाच्या अधिकारावर शंका घेत असता, हे ध्यानात ठेवले पाहिजे, असे भाऊ तोरसेकर म्हणाले.

यावेळी बोलताना माजी मंत्री बच्चू कडू म्हणाले की, कोणताही राजकिय वारसा नसताना, मोठ्या पक्षाचा पाठिंबा न घेता माझ्यासारखा कार्यकर्ता वीस वर्ष आमदार म्हणून निवडून आला. चांगल्या पत्रकारितेचा त्यासाठी आपल्याला फायदा झाला. मात्र आजच्या काळात वातावरणही गढूळ झाले आहे आणि पत्रकारिताही बदलली आहे. लोकहितासाठी आम्ही जी कामे करतो, जे प्रश्न मांडतो त्यासंबंधीच्या बातम्या आज छापून येत नाही किंवा दाखविल्या जात नाही. असे म्हणतात की, पूर्वी वर्तमानपत्र आधी छापले जायचे आणि नंतर विकले जायचे आता उलट झाले आहे. आता असं म्हणतात की, वर्तमानपत्र आधी विकले जाते नंतर छापले जाते, अशी टीका बच्चू कडू यांनी केली. आज संपूर्ण व्यवस्थाच बिघडली आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीत सत्य मांडणे आव्हानात्मक आहे. अनेक पत्रकार आज सत्य मांडण्याचे काम करित आहेत, ही समाजासाठी चांगली बाब आहे. असे बच्चू कडू म्हणाले.

यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ म्हणाले की, स्व. दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने जिल्हा मराठीपत्रकार संघाने सुरु केलेला हा पहिला जीवनगौरव पुरस्कार दिला जात आहे, याचा आपल्याला अत्यंत आनंद आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यापूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महाराष्ट्र केसरी नावाने एक नियतकालिक सुरु केले होते. लोकशिक्षण आणि विचारविनिमयाचे प्रभावी माध्यम म्हणून भाउसाहेबांनी त्याचा वापर केला होता. भाउसाहेबांच्या अमरावती जिल्ह्यात त्यांचे ते कार्य आज जिल्हा मराठी पत्रकार संघाकडून पूर्ण केले जात असल्याचे हेमंत काळमेघ म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी तर संचालन प्राजक्ता मशिदकर यांनी केले. संजय बनारसे यांनी आभार मानलेत. पाहुण्यांचे स्वागत उल्हास मराठे, त्रिदिप वानखडे, विजय ओडे, सुधीर भारती, मंगेश तायडे, गौरव इंगळे, संजय शेंडे, अरुण तिवारी, अनुप गाडगे, मनोहर परिमल, लोभस गडेकर, सुधीर केने, प्रणय निर्बाण यांनी केले.

### ■ पहिला पूरस्कार सदैव स्मरणात राहणार : अनिल अग्रवाल

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाने यावर्षी पासून राज्यस्तरीय पूरस्कार देण्यास सुरूवात केली आहे. भाउ तोरसेकरांसारख्या पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्वाला पूरस्कार प्रदान करताना आम्हाला अत्यानंद होत आहे. हा पहिला पूरस्कार सदैव स्मरणात राहणारा आहे, असे उद्गार अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणात बोलताना काढले. जीवनगौरव पुरस्काराला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व जिल्ह्यातील थोर नेते स्व. दादासाहेब काळमेघ यांचे नाव मिळाल्याने या पूरस्काराची शोभा वाढली आहे, असे अनिल अग्रवाल म्हणाले.

### ■ दडपणातूनही पत्रकारिता उभारी घेते : बोंडे

राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रांवर टाकण्यात आलेल्या बंधनांची आठवण काढली. तेव्हा सत्ताधाऱ्यांनी वृत्तपत्रांचेही तोंड दाबून ठेवले होते. पण प्रचंड दडपण असतानाही ते झुगारुन धाडसाने पत्रकारितेने पून्हा उभारी घेतली. पुर्नर्जिवित झाली. पुढे त्याच पत्रकारितेने देशात सत्ता बदल घडवून आणला आणि लोकशाही अखंडपणे सुरु राहीली, असे डॉ. अनिल बोंडे म्हणाले. आणीबाणीचा विचार करता किंवा आज अन्य देशांत पत्रकारितेवर असलेली बंधने पाहता, भारतात मात्र या क्षेत्राला पूर्णतः मोकळीक आहे. वृत्तपत्रे किंवा वृत्तवाहिन्या मुक्तपणे आपली मते मांडू शकतात. असे डॉ. बोंडे म्हणाले.–

### इतिहास प्रेरणा घेण्यासाठी असतो : श्रीमंत माने

इतिहास हा काहीतरी मिळवण्यासाठी किंवा गर्व बाळगण्यासाठी नसतो त्यातून प्रेरणा घ्यायची असते. एकेकाळात वऱ्हाड व अमरावती जिल्हा ऐश्वर्यसंपन्न होता. अमरावती शहरानं देशाला खूप काही दिलं आहे. पण आज येथील लोकांना त्याचा विसर पडला आहे. आताच्या राजकारणात खोट्या अभिमानाच्या मागे आपण आपली तत्व विसरून गेलो आहोत. यावर बोलण्याची गरज आहे. पत्रकारांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, अशी प्रतिक्रिया यावेळी बोलताना राज्यस्तरिय पत्रकारिता पुरस्कार प्राप्त दै. लोकमतचे संपादक श्रीमंत माने यांनी व्यक्त केली.

# मोर्शी ते वरूड मार्गावरील भाईपुर फाट्यावर भीषण अपघात

## भरधाव तवेरा पलटी, महिलेचा मृत्यू, १२ जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** भरधाव वेगाने असलेल्या एमएच-१२-एफझेड-११९६ क्रमांकाच्या टवेरासमोर रस्त्यावर अचानक मोकाट गुरे आल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि तवेरा रस्त्यावर पलटी झाली. या अपघातात एका कुटूंबातील १२ सदस्य गंभीर जखमी झाले असून उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यू झाला आहे. जखमींपैकी पाच जणांची प्रकृती अतिगंभीर असल्याचे समजते. मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या वरूड मार्गावर हा आज २७जानेवारी रोजी भीषण अपघात घडला. जखमींवर मोर्शी उपजिल्हा ग्रामीण रूग्णालय व अमरावती शहरातील इर्विनमध्ये उपचार सुरू आहे.

साजिया बानो अकरम अली (४०) असे मृतकचे नाव आहे. तर जखमींची नावे आलिशा फतेमा (९), आयेष फातिमा (१०), जेहान अली (१२), मोसीम खान (३४), इलायत अली (४०), शीजा फातिमा (१४), अत्तहर खान (१३), शहिदा बानो (५०), जहेरअसलम अली (५), फराह अंजुमन असलम अली (३०), अलीजा फतेह (७), आरजू फत्तेमा (४), बीबीनाज (३०) मृतक वजखमी सर्व रा.खरपी, ता.अचलपुर अशी आहेत. माहितीनुसार, टवेरामधील एकाच कुटूंबातील जखमी १२ जण आज ते खरपी येथे पांढऱ्या रंगाच्या वरील नमूद क्रमांकाच्या टवेरा कार गेले होते. सांयकाळच्या सुमारास परतीच्या प्रवासातटवेरा कार मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरूडकडे जात असताना भाई पुर फाट्यावर अचानक कारसमोर रस्त्यावर मोकाट गुरे आले आणि विरूध्द दिशेने एका वाहन भरधाव वेगाने येत होते. त्यामुळे टवेरा चालकाचे अचानक नियंत्रण सुटल्याने टवेरा रस्त्यावर पलटी होऊन रस्त्यालगतच्या बाजूला खाली दुरवर फेकल्या गेली. अपघाताची माहिती मिळताच मोर्शीचे ठाणेदार नितिन देशमुख तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावर बघ्यांची गर्दी उसळल्याने मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतुक काहीकाळ ठप्प झाल्याने किरकोळ तनाव निर्माण झाला होता. तत्पूर्वीच पोलिसांनी रूग्णवाहिका घटनास्थळावर पाठविल्या होत्या. रूग्णवाहिकेव्दारे सर्व जखमींना प्रथम मोर्शी उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, पाचजणांची प्रकृती अतिगंभीर असलयाने त्यांना अमरावती इर्विनमध्ये रेफर करण्यात आले. सर्व जखमींना रूग्णालयात पाठविल्यानंतर पोलिसांनी क्रेन बोलावून टवेरा कार ठाण्यात नेली. तर पोलिसांच्या अन्य पथकाने मार्गावरील वाहतुक सुरळित केली.



# धारणीत भूमाफियाविरोधात पहिला गुन्हा दाखल

## शेख बिसमिल्ला व मयूर चौहान आरोपी

### सार्वजनकि व बालवाडीच्या जागेवर केले प्लॉट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८धारणी–** धारणी शहर आणि लगतच्या तलई, कुसूमकोट, बासपाणी, टाकलखेडा आणि दिया गावशिवारातील शेत जमिनीचे भाव गगनाला भिडल्याने धारणीतील कॉलीनायजरांच्या तोंडाला पाणी सुटले आहे. नेहरूनगर जवळच्या कॉलनीत बालवाडी आणि खेळाचया मैदानाचया जागेत १० प्लॉट दर्शवून खोटा व बनावटी नकाशा तयार करून ती जणांनी शासनाला फसविल्याने एकच खळबळ माजलेली आहे. तिघांविरोधात धारणी पोलिसात गंभीर गुन्हा दाखल झाल्याने सर्व आरोपी फरार झाले आहेत.

धारणी शहरातील सर्व्हे नंबर १८४ मधील बालवाडी व सार्जजनिक वापराच्या जागेत १० प्लॉट दर्शविणारा व विक्री न झालेला नकाशा बनावट तयार करून विक्री करण्याचे प्रयत्न करणाऱ्या प्लॉट मालक शोएब मो.शब्बीर, मयुर चौहान व शेख बिसमिल्ला यांचे विरुध्द धारणी येथील तलाठी विनोद तायडे यांनी पोलिसात तक्रार दाखल करताच गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांविरोधात चौकशी सुरू झालेली आहे. बनावट नकाशाच्या आधारावर कोटयावधीचे १० प्लॉट विकणाऱ्या या गोरखधंद्यात विस्कृत चौकशी झाल्यास अनेकांची नावे समोर येण्याची शक्यता पोलिस निरिक्षक अशोक जाधव यांनी व्यक्त केलेली आहे. कॉलनीतीलकॉलनीतील इमरान अ. गफ्फार व इतर बारा प्लॉट धारकांनी बोगस नकाशा, बनावट सातबारा व अवैध विक्री झाल्याबाबती उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदिवली होती. या अनुशंगाने चौकशी झाल्यावर प्लॉट क्रमांक ६७ ते ७५ म्हणजे एकूण १० भुखंड सार्वजनिक उपयोगाच्या व बालवाडीसाठी सोडण्यात आल्याचे स्पष्ट झाले. यासाठी ९० च्या दशकात कॉलनीचा मुळ नकाशा नगर रचना विभाग अमरावती कार्यालयाकडून प्राप्त करण्यात आल्यानंतर पटवारी कडून पोलिस तक्रार करण्यात आली. पोलिसांनी मोक्यावर भेट देऊन वास्तविक स्थितीची पहाणी करून संज्ञान घेण्यात आल्यावर मयुर, बिसमिल्ला व शोएब विरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरिक्षक सतीषझाल्टे, हेड कॉस्टेबल वसंत चव्हाण, मोहन आकाशे, जगत तेलगोटे करित आहेत. गुन्हे दाखल होताच तिन्ही आरोपी पसार झाले असून लवकरच त्यांना अटक होईल, असे पोलिसांचे म्हणने आहे.सार्वजनिक जागेत बालवाडी, महावितरण विभागाची डीपी, नगर पंचायतचे नाली बांधकाम आणि नपच्या पाणी पुरवठा विभागाचे बोअर सुध्दा केलेले असताना नकाशात खुले प्लॉट दर्शवून प्लॉट क्रमांक पण काल्पनिक प्रस्तुत करून बनावट दस्ताऐवजाच्या आधारावर शासन आणि प्लॉट खरेदी करणाऱ्यांना गंडविण्याच्या किंवा फसविण्याचा डाव आरोपींचा उधडण्यात आलेला आहे. प्लॉट वलेआऊटमधील सार्वजनिक जागा विकण्याचा डावइतर कॉलीनायजर सुध्दा करूशकतात अशी शक्यता नाकारतायेत नाही. अच्छेदिन भोगणाऱ्या माफियांचे आता बुरे दिन सुरू झालेले आहे

# काँग्रेसकडे मुद्देच नाहीत ! फक्त फोटो सेशनसाठी आंदोलन अन् ईव्हीएमचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २८नागपूर : –** विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाला. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी काँग्रेसकडे कोणताही मुद्दा नाही. त्यामुळे ते ईव्हीएमबाबत 'फेक नॅरेटिव्ह' तयार करण्यात व्यस्त आहेत, अशी टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

बावनकुळे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुती आणि भाजपला झटका बसला. यासाठी आम्ही ईव्हीएमला दोष दिला नाही. काँग्रेसने आरोप करण्याऐवजी आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला त्यांनी दिला लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने कशी तयारी केली हे भाजपने वारंवार उघड केले आहे.



संध्याकाळी मतदान कसे वाढले याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत विरोधकांना दिली होती. निवडणूक आयोगाने सर्व पक्षांना ईव्हीएम 'सेट' करून दाखवण्याचे खुले आव्हान दिले आहे. पण एकाही पक्षाने हे आव्हान स्वीकारले नाही. आता काँग्रेस आंदोलन करून प्रसिद्धीचा स्टंट करत आहे. काँग्रेसतर्फे केली जाणारी आंदोलने फक्त फोटोसेशन पुरती मर्यादित राहिली आहेत, अशी टीका त्यांनी केली.

**कोराडी मंदिराला दिलेला भूखंड नियमानुसारच –** कोराडी मंदिराला ६०० कोटी रुपयांची जमीन नाममात्र दरात देण्यात आल्याचा आरोप खा. संजय राऊत यांनी केला होता. यावर बावनकुळे म्हणाले, संजय राऊत यांच्या डोक्याला वेडेपणा लागला आहे. त्या जमिनीची चार कोटी तीस लाख रुपये मार्केट प्राईस आहे. आता २० लाख रुपये संस्थानने भरले आहेत आणि पुढच्या ३० वर्षात ४ कोटी २० लाख व्हॅल्युएशन आले आहे.

जेलमध्ये गेलेले लोक आरोप करतात. राऊत यांनी महालक्ष्मी मंदिरात येऊन कुठली जमीन घेतली ते दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

# चिल्लर पैसे देण्यावरून प्रवाशाने केली एसटी बस वाहकास मारहाण

## वादादरम्यान चालकाने बस रोखल्यानंतर प्रवासी झाला फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८दर्यापूर –** तालुक्यातील नांदेड बु.येथे २६ जानेवारी रोजी दुपारी दीड वाजता चिल्लर पैसे देण्यावरून प्रवाशाने बस वाहकाला मारहाण केल्याची घटना घडली. याबाबत वाहकाने दर्यापूर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी पवनकुमार सहगल वय ४२, हे एसटीच्या दर्यापूर आगारमध्ये वाहक म्हणून कार्यरत आहेत. ते दर्यापूर–नांदेड बु. येथे एमएच १४ बीटी ३२५८ क्रमांकाची बस घेऊन दुपारी १ वाजता पोहोचले. काही वेळ तेथे थांबून सहगल व बसचालक दिनकर सांगळे हे बस घेऊन दर्यापूरकडे परत निघाले. नांदेड बु. गावातून निघत असता वाहकाला काही प्रवाशांनी तिकीट काढले, तर काहींचे तिकीट काढणे बाकी असल्याचे लक्षात आले. वाहक तिकीट देत असताना नांदेड बु. गावातील एका प्रवाशाने वाहकाला आमला गावाकरिता दोन तिकीट मागितले. प्रवाशाला तिकिटाचे पैसे मागितल्यानंतर त्याने वाहकाला ३० रुपये दिले. दोन्ही तिकिटांचे २२ रुपये झाल्याने वाहकाने प्रवाशाला २ रुपये सुटे मागितले. त्यावर त्याने चिल्लर पैसे नाहीत, तुम्हीच मला चिल्लर पैसे द्या, असे म्हणत वाहकासोबत वाद घातला. सोबतच शिवीगाळ करून बुक्क्यांनी नाकावर व डोक्यावर मारहाण केली. त्यामुळे वाहकाच्या नाकातून रक्त निघाले. त्यांना भोवळ आल्याने ते बसमध्ये खाली कोसळले व हातातील तिकिटाचे पैसे खाली पडले.

वाद सुरू असतानाच चालकाने बस थांबवली. ही संधी साधून मारहाण करणारा प्रवासी बसमधून पळून गेला. ज्या प्रवाशाने मारहाण केली त्याचे नाव दानिश



उम्मीदखाँ पठाण, रा. नांदेड बु. असे असल्याचे समजले. वाद झाल्याने बसमधील सर्व प्रवाशी खाली उतरले. त्यामुळे वाहकासह बसचालकाने पोलिस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी दानिश उम्मीदखाँ पठाणविरुद्ध शिवीगाळ, बुक्क्यांनी मारहाण व सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे.

# सोयाबीन खरेदीत महाराष्ट्र देशात नंबर एकवर: ५ राज्यांना टाकले मागे

## खरेदीची मुदत महिनाअखेरपर्यंत वाढवली– मंत्री जयकुमार रावल





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ नवी दिल्ली–** सोयाबीन खरेदीमध्ये महाराष्ट्राने देशात बाजी मारली आहे. राज्यात नोंदणी झालेल्या ७ लाख ६४ हजार ७३१ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६९ हजार ११४ शेतकऱ्यांकडून ७ लाख ८१ हजार ४४७ मेट्रिक टन सोयाबीन खरेदी झाला आहे. मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात आणि तेलंगण या राज्यांना मागे टाकत देशांमध्ये सर्वाधिक सोयाबीन खरेदी महाराष्ट्राने केली आहे. यासंदर्भातली माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे.मंत्री जयकुमार रावल म्हणाले, अनेक जिल्ह्यांनी आपले खरेदी उद्दिष्ट पूर्ण केले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला अडचण येऊ नये यासाठी वेगाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया करण्याची तसेच दोन ते तीन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम पोहोचेल या संदर्भात वेगाने कार्यवाही करण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या आहेत. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत खरेदी चालू राहणार असल्याने सोयाबीन खरेदीच्या आकडेवारीत मोठी वाढ दिसेल. सोयाबीन खरेदीची मुदत वाढवण्याची गरज भासल्यास केंद्र सरकारकडे मुदत वाढवून मागीतली जाईल.

मंत्री जयकुमार रावल पुढे बोलताना म्हणाले, राज्यात नाफेड व एनसीसीएफ अंतर्गत सहा राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून नोंदणी सुरू केली होती. त्यानुसार दि.१५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यातील ५६२ खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष खरेदी सूरू करण्यात आली आहे. नोंदणी करता येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे नोंदणीची मुदत एक वेळा वाढवली. त्यानंतर सुरुवातीला सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी २०२५ पर्यंत होती, मात्र या मुदतीत अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी न झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांना विनंती करून खरेदीची मुदत दि. ३१ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवली आहे.

# फ्लिपकार्ट ऑनलाईन खरेदीत फसवणूक

## डिजिटलच्या नावावर पाठविली बनावटी घड्याळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** फ्लिपकार्टच्या माध्यमातून ऑनलाईन अॅपल डिजिटल घड्याळ बोलाविली. परंतु डिजिटल घड्याळच्या नावावर बनावटी घड्याळ आल्याचे स्पष्ट होताच करण उदय देशमुख (रा. मोर्शी रोड, कलीम पेट्रोल पंपाच्या मागे) यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दिली.

करण देशमुख यांनी २४ जानेवारीला फ्लिपकार्ट या ऑनलाईन खरेदी मंचावरून अॅपल महागडी डिजिटल घड्याळ ८९ हजार ९९८ रुपयांची ऑनलाईन बोलावली होती. २७ जानेवारीला सकाळी सदर घड्याळ दिलेल्या पत्यावर



फ्लिकार्टच्या डिलिव्हरी एजंटमार्फत आली. त्यांनर करण देशमुख यांनी पार्सल उघडून बघितले असता डिजिटल घड्याळ बनावट असल्याचे वाटले. दरम्यान डिलिव्हरी एजंटने पार्सल माझ्या परवानगीशिवाय उघडले व काही फोटोज घाईत काढून पार्सल पुन्हा पॅक केले. तसेच तपासणी करण्यासाठी वेळ न देता इतर ऑर्डरसह पार्सल दिले.

त्यानंतर त्यांनी पार्सल उघडून पाहिले असता त्यामध्ये डिजिटल घड्याळचे वजन खूपच कमी होते. ब्लॅक टायटॅनियम रंगाची ऑर्डर केली होती. परंतु सिल्व्हर रंगाचे घड्याळ मिळाले, डिजिटल घड्याळ पूर्णपणे डमी युनिट होते व चालू होत नव्हते आणि घड्याळसोबत दिलेला स्ट्रॅपही नकली होता. त्यामुळे घड्याळ खरेदीत आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षत येताच संबंधित व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची तक्रार करण देशमुख यांनी गाडगेनगर ठाण्यात दिली आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया पालकांना दिलासा, २ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

## जिल्ह्यात ६ हजार ५३३ बालकांचे अर्ज सादर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती**

आर्थिक दुर्बल घटकातील पाल्यांना नामांकित खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश प्रक्रियाराबविण्यात येत आहे. या आरटीईत प्रक्रियेला जिल्ह्यात पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात २ हजार ४३० जागांकरीता होत असलेल्या प्रवेशासाठी सोमवार २७ जानेवारी शेवटची तारीख होती. त्यामुळे पालकांनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शिक्षण विभागाकडून याला मुदतवाढ दिली आहे. आता २ फेब्रुवारी पर्यंत पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश – अर्ज करता येईल. मुदतवाढ मिळाल्याने पालकांना दिलासामिळाला आहे. सोमवार सायंकाळ सात वाजेपर्यंत ६ हजार ५३३ प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहे. आगामी सहा दिवसात १० हजारांवर अर्ज येण्याची शक्यता आहे.जिल्हयात आरटीई प्रक्रियेला १६ डिसेंबरपासून सुरुवात करण्यात आली –यामध्ये ४ जानेवारीपर्यंत पहील्या टप्प्यात शाळा नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. यादरम्यान जिल्ह्यातील पात्र २३९ शाळांपैकी यंदा २२५ शाळांची नोंदणी करण्यात आली आहे.




नोंदणी झालेल्या शाळांच्या पटसंख्येच्या २५ टक्केच्या प्रमाणात २ हजार ४३० जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. या जागांवर आता निःशुल्क आरटीई प्रवेश स्वीकारल्या जात आहे. या दरम्यान १५ जानेवारीपासून ऑनलाईन अर्ज करण्याला सुरूवात करण्यात आली. सोमवार २७ जानेवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत जिल्ह्यात ६ हजार ५३३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अर्ज करण्याची धुम जिल्ह्यात दिसून येत आहे.यंदा गतवर्षी पेक्षा अधिक अर्ज दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. य प्रक्रियेनंतर प्राप्त अर्जामधून लॉटर काढण्यात येणार आहे. या लॉटरीमध् नशिबवान बालकांचे प्रवेश स्विकारव जाणार आहे. तत्पूर्वी सोमवारी अ करण्याची शेवटची संधी पालकांना होत त्यामुळे पालकांनी मुदतवाढ देण्या मागणी होत असतांना शिक्षण विभागाने दिली आहे. त्यामपालकांचा हिलाम्या मिळाला आहे.

# रंगकाम करणाऱ्याच्या मुलीची संघर्ष कहाणी, आयएएसची उत्तीर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –** गरिबांच्या वस्तीत राहणाऱ्या पल्लवी चिंचखेडे हिने कठीण परिस्थितीत भरारी घेत भारतीय प्रशासकीय सेवेची (आयएएस) परीक्षा उत्तीर्ण केली. तिचे वडील रंगकाम तर आई शिलाई काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अमरावती कॅम्प विभागातील बिच्छू टेकडी, चपराशी पुरा या झोपडपट्टीत राहणाऱ्या पल्लवी देवीदास चिंचखेडे असे युपीएससीची आयएएस परीक्षा उत्तीर्ण केलेल्या मुलीचे नाव आहे. तिचे वडील रंगकाम तर आई शिलाई काम करून उदरनिर्वाह करतात. आताही पल्लवीच्या घराला जायला रस्ता नाही. पल्लवी सातवीत असतांना मिशन आयएएस अमरावती या संस्थेने आयोजित केलेल्या तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कार्यक्रमात वडिलांसह गेली होती. येथूनच तिला सनदी अधिकारी होण्याची प्रेरणा मिळाली.

दरम्यान पल्लवी डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी मध्ये गेली. येथे तिची संस्थेचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांच्याशी भेट झाली. पल्लवीने त्यांचे मार्गदर्शन घेतले. प्रा. काठोळे यांनी तिला स्पर्धा परीक्षेची काही पुस्तके भेट दिली. त्यानंतर जेव्हा जेव्हा अमरावतीला स्पर्धा परीक्षा कार्यशाळा व्हायच्या तेव्हा तेव्हा तिने त्या स्पर्धा परीक्षा कार्यशाळेमध्ये भाग घेतला. तिने सातवीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. तिच्या आजूबाजूला साधारणता मजूर वर्ग सामान्य कुटुंबातील लोक राहतात. घरात पुरेशी जागा नाही. अभ्यासाचे वातावरण नाही पण त्या परिस्थितीवर मात करून तिने युपीएससीची परीक्षा उत्तीर्ण करून अमरावती शहराचे नाव मोठे केले.

### पल्लवीचे शिक्षण

पल्लवीने अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर तिने एका खाजगी कंपनीमध्ये तीन वर्ष नोकरी केली. परंतु त्यामध्ये तिचे मन रमले नाही. त्यानंतर तिने नोकरीचा राजीनामा देत समाज कल्याण विभागाच्या बार्टी या शासकीय सामाजिक संस्थेच्या सहकार्याने आपले केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आयएएस या परीक्षेची तयारी पूर्ण केली.




### अभ्यासादरम्यान या आल्या अडचणी

पल्लवी जिथे राहते तेथील स्थिती विपरीत आहे. टेकडी जवळच वडाळी तलाव आहे. येथून गेलेल्या महामार्गावरून सतत ट्रकची ये– जा असते. त्यामुळे अभ्यासादरम्यान सतत व्यत्यय येतो. या परिस्थितीवर मात करून आज पल्लवी यूपीएससीची परीक्षा पास झाली आहे. आपल्या यशाचे श्रेय तिने वडील देवीदास चिंचखेडे यांना दिले.

## जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा महोत्सव

# अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुलात ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत आयोजन

### १४ तालुका संघ,मुख्यालय,अधिकारी वर्ग एकुण १६ संघाचा राहणार सहभाग : जिल्हातील तिन हजार अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

दैनदिन सततच्या कामाचा ताणतनाव कमी व्हावा या करीता दरवर्षी अमरावती जिल्हा परिषदअधिकारी व कर्मचारी क्रिडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.या वर्षाला विभागीय क्रीडा संकुल अमरावती येथे ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत संपन्न होणार आहे. जिल्हातील तिन हजार अधिकारी,कर्मचारी सहभागी होणार आहे.सांघिक व वैयक्तीक स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी असणार आहे, या चार दिवसीय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन गुरुवारला (ता.३०) सकाळी १० वाजता आहे.उदघाटक म्हणून जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित राहणार आहे.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र ह्या राहतील.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी,जिल्हा पोलिस अधीक्षक, विशाल आनंद,महानगर पालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे,सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत, मिन्नू पी एम., जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस उपस्थित राहणार आहे.तसेच डी.आर.डी.ए.च्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अश्विनी मारणे, समाज कल्याण अधिकारी ज्ञानोबा पुंड, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, डॉ पुरुषोत्तम सोंळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.सुरेश आसोले, जिल्हा आरोग्य अधिकारी,बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, कृषि विकास अधिकारी मलप्पा तोडकर,पावस्व विभागाचे प्रभारी




उपमुख्य कार्यकारी अधिकारीसंजय खारकर, नारेगाचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी प्रतीक चन्नावार, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे हे सुद्धा पाहुणे म्हणून राहतील.अशी माहीती क्रिडा महोत्सवाचे सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस व क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे यांनी दिली. या चार दिवसीय क्रिडा महोत्सवाचा समारोप फेब्रुवारी रोजी होणार आहे. असे क्रिडा महोत्सवाचे प्रसिध्दी समितीचे विनायक लकडे,शकील अहमद,राजेश सावरकर,श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.

१४ तालुका संघ,१मुख्यालय व १अधिकारी वर्ग असे १६ संघ सहभागी होणार आहे.सांघिक व वैयक्तीक स्पर्धा मध्ये क्रिकेट,खो-खो,कबड्डी,व्हॉलीबॉल पासींग,व्हॉलीबॉल स्ट्रोक्स,फुटबॉल,बॅडमिंटन एकेरी,बॅडमिंटन दुहेरी,बॅडमिंटन एकेरी ४५ वर्षावरील,बॅडमिंटन दुहेरी ४५ वर्षावरील,टेबल टेनिस एकेरी, टेबल टेनिस दुहेरी, टेनिक्कॉईट एकेरी,टेनिक्कॉईट दुहेरी,कॅरम एकेरी,कॅरम दुहेरी तसेच १०० मिटर धावणे,थाळी फेक, गोळा फेक,भाला फेक,१०० मिटर धावणे,२०० मिटर धावणे,४०० मिटर धावणे,१५०० मिटर धावणे,१०० मिटर धावणे ४५ वर्षावरील,१०० मिटर धावणे ४५ वर्षावरील,रिले रेस ४-१००,लांब उडी,उंच उडी,थाळी फेक,गोळा फेक,भाला फेक,स्विमिंग ५० मी,स्विमिंग १०० मी,स्विमिंग ५० मी (४५ वर्षावरील),स्विमिंग १०० मी (४५ वर्षावरील) व बुद्धिबळ यात महिला व पुरुष अधिकारी, कर्मचारी सहभागी होणार आहे.

३० जानेवारीला एक दिवस संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सांस्कतिक कार्यक्रमामध्ये भक्तीगीत, भावगीत, लोकगीतसिनेगीत, हास्यजत्रा, समूहनृत्य, कारओके एकल नृत्य व आदींचा समावेश आहे.यात अंजनगाव सुर्जी,मोर्शी,अधिकारी वर्ग,चांदुर रेल्वे,दर्यापूर, चिखलदरा,धामणगाव रेल्वे,नांदगाव खंडेश्वर, तिवसा,भातकुली,धारणी, अचलपूर, मुख्यालय, अमरावती,चांदुर बाजार,वरुड या पंचायत समितीमधील अधिकारी कर्मचारी आपल्या कलेचा आविष्कार सादर करणार आहे.

## ३० जानेवारीला अमरावती व भातकुली तालुक्यातील पाणी टंचाई ची बैठक व तालुका क्रिडा संकुल समितीची सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती व बडनेरा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आ.रवि राणा हे मतदार संघातील दोन्ही तालुक्याचे पाणी टंचाई आढावां बैठक मद्ये असलेल्या समस्याचे निराकरण करण्याकरीता त्वरीत त्यावर उपाययोजना करुन नागरीकांना मुलभुत सोयी सुविधा पुरविने साठी निर्देश आढावा बैठक मद्ये देणारं आहेतः दि.३०जानेवारी, २०२५रोजी अमरावती नवीन तहसिल कार्यालयातील सभागृहात आयोजित केली आहे.येणाऱ्या उन्हाळयाच्या दिवसामध्ये अमरावती व भातकुली ग्रामीण भागातील कोणत्याही गावामध्ये पाणी टंचाई निर्माण होऊ नये व नागरीकांना पिण्याचे पाणी इतर ठिकाणावरुन मोठे अंतर गाठुन आणावे लागणार नाही याचीच दक्षता घेवुन अमरावती व भातकुली तालुक्यातील पाणी टंचाई संबधीत असलेल्या सर्व अधिकारी यांना बैठकीमध्ये उपस्थित राहण्याच्या सुचना दिलेल्या असून या बैठकीमध्ये ज्या ठिकाणी पाणी टंचाई निर्माण होते त्या ठिकाणी उपाययोजना करण्याकरीता चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे या बैठकीमध्ये अमरावती व भातकुली येथील क्रिडा संकुल समितीची सुध्दा




बैठक आयोजीत केलेली असून या बैठकीमध्ये अधिकारी यांना उपस्थित राहुन चर्चा करुन निर्णय घेण्याकरीता आढावा बैठक आयोजीत केलेली आहे.

त्यामुळे बडनेरा मतदार संघातील ज्या गावामध्ये पाणी टंचाई निर्माण होते. तेथील ग्रामस्थानी या बैठकीमध्ये उपस्थित राहुन आपल्या गावातील समस्या मांडाव्या. जर सरपंच, सचिव, उपसरपंच, युवा स्वाभिमान पार्टी चे पदाधिकारी यांनी आप आपल्या गावातील पाणी टंचाई परिस्थिती संबधीत समस्या लेखी स्वरूपात त्यांचें सचिव उमेश ढोणे मो.९०४९०६७३३१कडे देण्यात यावे त्या अनुषगाने अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात येईल आ.रवी राणा यांनी सांगितले आहे.या संबंधाने आवाहन करण्यात येत आहे.

## ३१ जानेवारीला पालकमंत्री बावनकुळे यांची आ.राणा कडे सदिच्छा भेट!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

नुकतेच अमरावती जिल्ह्याचे पालकतत्व स्विकारणारे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांचा ३१ जानेवारी २०२५ रोजी





अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्याचा कार्यक्रम ठरलेला असून या दौऱ्यादरम्यानच प्रथमच पालकमंत्री म्हणून अमरावती येत असलेले ना.चंद्रशेखर बावनकुळे हे आ.रवि राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी सकाळी १०.०० वा. सदिच्छा भेट देणार असल्याचे दौऱ्याच्या कार्यक्रमानुसार ठरले आहे. या सदिच्छा भेटी दरम्यान पालकमंत्री ना.चंद्रशेखरजी बावनकुळे व आ.रवि राणा हे विविध विषयांवर चर्चा करणार असल्याचे सांगितले जात आहे. व तसेच बीजेपी व युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्या सोबत चर्चा करणार तसेच सामाजिक कार्यकर्ता सोबत चर्चा करणार आहेत

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये डीजे नाईटचा कार्यक्रम संपन्न

### महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्लबचे आयोजन







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये नुकताच डीजे नाईटच्या रूपाने जल्लोष आणि ऊर्जा यांचा अनोखा संगम पहायला मिळाला. 'उन्मेष २०२५' या नावाने आयोजित केलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले. आधुनिक संगीत, प्रकाशझोत, आणि दमदार डीजे परफॉर्मन्स यामुळे संपूर्ण वातावरण ऊर्जेने भरले होते. संपूर्ण कॅम्पस डिस्को लाइट्स, जोशपूर्ण संगीत, आणि तरुणाईच्या उत्साहाने भारून गेला.

डीजे नाईटमध्ये पुणे शहरातील प्रसिद्ध डीजे प्रोजेक्ट-९१ यांनी धमाकेदार परफॉर्मन्स सादर केला. त्यांनी लोकप्रिय आणि ट्रेंडिंग गाण्यांचा मेळ साधत उपस्थित विद्यार्थ्यांना नृत्याच्या तालावर थिरकायला लावले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्लब ने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी स्टेज डेकोरेशनपासून ते लाईट आणि साऊंड सिस्टिमपर्यंत प्रत्येक गोष्टीत कल्पकता दाखवली. परिसरात आकर्षक सजावट आणि सेल्फी पॉइंट्स उभारण्यात आले होते, जेथे विद्यार्थ्यांनी आनंदाने फोटो काढले.कार्यक्रमात शिस्तबद्धतेला प्राधान्य देण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने महाविद्यालयाने ठोस उपाययोजना केल्या होत्या. स्वयंसेवकांनी उपस्थितांची काळजी घेतली, तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी एक स्वतंत्र टीम कार्यरत होती.रात्री उशिरा हा कार्यक्रम 'वंदे मातरम' आणि 'भारत माता की जय' या घोषणांनी थाटात संपन्न झाला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपाहार देण्यात आला.डीजे नाईट या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेमुळे महाविद्यालयातल्या पुढील सांस्कृतिक उपक्रमांविषयीची उत्सुकता वाढली आहे.

## शहरातील २३५ बंगाली नागरिकांची तपासणी पूर्ण एकही बांगला देशी नागरिक आढळला नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शहर पोलिसांनी शहरात राहणाऱ्या २३५ बंगाली नागरिकांची कागदपत्रासह बायोमेट्रिक तपासणी केली असून तपासणी दरम्यान एकही बांगलादेशी नागरिक आढळला नाही.महाराष्ट्रात गेल्या काही दिवसापूर्वी दोन बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली होती.

दरम्यान शहरातील काही राजकीय पदाधिकाऱ्यांनी याआधी शहरात बांगलादेशी नागरिक राहत असल्याचा आरोप केला होता. त्यामुळे शहर पोलिसांनी शहरात राहणाऱ्या बंगाली नागरिकांची चौकशी करून त्यांच्या जवळील कागदपत्रांची तपासणी सुरु केली आहे. गुरुवारी गुन्हेशाखेच्या युनिट दोन व एटीबीच्या पथकांनी रहाटगाव मार्गावरील अंबा बिजनेस पार्क येथे काम करणाऱ्या ९४ बंगाली नागरिकांच्या कागदपत्राची पाहणी करून प्रत्येकाची बायोमेट्रिक तपासणी केली होती.नागपुरी गेट पोलिसांनी अलिम नगर,अन्सार नगर शहरातील २३५ बंगाली नागरिकांची तपासणी पूर्ण येथे राहणाऱ्या ९१ बंगाली



नागरिकांची तपासणी केली. तर युनिट दोनच्या पथकाने सीटीलँड मार्केटमधील १४४ बंगाली कामगारांची तपासण केली आहे. तपासणी दरम्यान अधिकाऱ्यांनी प्रत्येक व्यक्तीचे आधार कार्ड मतदान कार्ड, जन्म दाखला अशा सर्व कागदपत्रांची पाहणी करून प्रत्येकांच बायोमेट्रिक तपासणी केली. परंतु तपासणी दरम्यान एकही बांगलादेश नागरिक आढळला नाही.

## दुकानासमोर दुचाकी लावल्यावरून दोन सराफा व्यावसायिकात हाणामारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

दुकानासमोर ग्राहकाने दुचाकी लावल्यामुळेदोन सराफा व्यावसायीकात चांगलिच हाणामारी झाल्याची घटना शनिवारी रात्री सराफा बाजारात उघडकीस आली. या घटनेत खोलापुरीगेट पोलिसांनी यश जाधव यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. शुभम गोगटे, नमन गोगटे, सुनील गोगटे (सर्व रा. मोतीनगर) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.सराफा बाजार येथील महाराणा प्रताप पुतळ्याजवळ यश जाथव यांचे



सराफा दुकान आहे आणि त्यांच्या दुकानाला लागूनच गोगटे यांचे दुकान आहे. शनिवारी सायंकाळी एका ग्राहकाने त्याची दुचाकी यश जाधवच्या दुकानासमोर उभी करून गोगटेच्या दुकानात गेला. परंतु दुकानासमोर दुचाकी लावल्यामुळे जाधवने त्याला दुचाकी पुढे लावायला सांगितली. त्यावरून गोगटे व जाधव यांच्यात वाद झाला.रात्रीला यश जाधव दुकान बंद करून दडिलांसोबत घरी जाण्याकरिता निघाले असता गोगटेने त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. त्यामुळे वाद चांगलाच वाढला. तेव्हा यशचे वडील मध्यस्थी करण्याकरिता गेले असता गोगटेने त्यांना सुध्दा मारहाण केली. त्यामुळे यशने खोलापुरीगेट ठाण्यात तक्रार दिली. त्यां आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चौघांनाही रात्री उशीरापर्यंत ठाण्यात बसवून ठेवले.

## शाळास्तरावरील विविध समित्या विसर्जित करा : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे शासनाकडे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शाळा स्तरावरील विविध समित्या, त्यांच्या सभेमुळे दैनंदिन अध्यापन कार्य प्रभावित होते, असे सांगत शाळा स्तरावरील विविध समित्या विसर्जित करण्याबाबतचे निवेदन शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त पुणे सचिन्द्र प्रताप सिंग यांना नुकतेच दिले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये त्याच गावातील व परिसरातील शिक्षण घेणाऱ्या बालकांचे पालक शेतकरी-शेतमजूर, कष्टकरी कामगार अशा गरीब घटकातील असतात. शाळेत असणाऱ्या विविध समित्यांमध्ये तेच ने पालक आलटून-पालटून असतात. दरमहा वेगवेगळ्या समितीच्या मिटींगला ते रोजमजुरी सोडून उपस्थित राहू शकत नाही. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक प्राथमिक शाळांमध्ये स्वतंत्र मुख्याध्यापक नसून शिक्षकेत्तर कर्मचारी नाही. तसेच बहुतांशी मुख्याध्यापकाला दोन-तीन वर्गाचे अध्यापन कार्यसुद्धा करावे लागते. त्यामुळे शालेय व्यवस्थापन, विविध समित्यांच्या सभा नियोजन व



इतिवृत्त अशा सर्व कारणामुळे अध्यापन कार्य प्रभावित होते. बालकांच्या मोफत व - सक्तीच्या शिक्षणाचा अधिकारअधिनियम-२००९ नुसार शाळा व्यवस्थापन समिती प्रत्येक शाळेत आहे. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती वगळता इतर सर्वच समित्या बंद/विसर्जित करून शाळा व्यवस्थापन समितीच्या अंतर्गत सर्व काम चालणे योग्य राहील. द्विमासिक सभांमध्ये सध्याच्या समितीच्या अंतर्गत येणारे विषय घेण्याचे नियोजन केल्यास इतर कोणत्याही समित्यांची गरज राहणार नाही, असे या निवेदनात नमूद करण्यात आले.

**प्राथमिक शाळा स्तरावरील समित्या**

शाळा व्यवस्थापन समिती, परिवहन समिती, इमारत बांधकाम समिती, शालेय पोषण आहार समिती, महिला तक्रार निवारण समिती, विशाखा समिती, माता पालक संघ, शिक्षक-पालक संघ, सखी सावित्री समिती, आपत्ती व्यवस्थापन समिती, बाल रक्षक, विद्यार्थी सुरक्षा समिती, प्रहरी क्लब, इको क्लब, निपुण भारत- माता पालक गट, तंबाखू व्यसनमुक्ती समिती, राजू-मिना मंच, बालहक्क तक्रार निवारण समिती याशिवाय काही जिल्ह्यात अजून अधिक वेगवेगळ्या समित्या शाळा स्तरावर स्थानिक यंत्रणेने निर्माण केल्या आहेत.

# स्थानिक विकास कामांसाठी प्रत्येक आमदाराला मिळणार एक कोटी ८० लाख रुपये

## आमदारांना फिलगूड मार्चपर्यंत मिळणार : डीपीसीत जिल्ह्याचा ४१७ १कोटींचा आराखडा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

विधानसभा निवडणुकीत पाच आमदार नव्याने निवडून आले आहे. या आमदारांना स्थानिक विकास कामांसाठी मार्चपर्यंत १.८० कोटींचा विकास निधी उपलब्ध होणार आहे. शिवाय तीन आमदार पुन्हा निवडून आले आहेत. त्यांचा यापूर्वीच्या टर्मचा निधी पूर्ण झालेला आहे, म्हणजेच त्यांनादेखील एवढाच निधी मार्चपर्यंत मिळेल. दरम्यान ३१ जानेवारीला पालकमंत्री आढावा घेणार असल्याने नियोजन विकास जिल्हा आराखड्यात व्यस्त आहे.

तिवसा मतदारसंघात राजेश वानखडे, मोर्शी–वरुडमध्ये उमेश यावलकर, अचलपूरमध्ये प्रवीण तायडे, मेळघाटमध्ये केवळराम काळे, तर दर्यापूरमध्ये गजानन लवटे पहिल्यांदा निवडणूक आले. तर, धामणगाव मतदारसंघात प्रताप अडसड, बडनेरात रवी राणा व अमरावतीत सुलभा खोडके पुन्हा विजयी झाल्याने त्यांना मिळणार पाच कोटींचा निधी कायम राहणार आहे,आराखड्यात ७२.७० कोटींची आरोग्य व रस्ते, पुलासाठी ४०, नगरविकास ३४.५२, पशुसंवर्धन ११.७०, वन २७.२३, सहकार ३, ग्रामीण विकास ३०, पाटबंधारे ११, क्रीडा ८, उच्च शिक्षण १६, तिर्थक्षेत्र विकास १२, शिक्षण २४, महिला व बाल कल्याण १२.५०, उर्जा ३०, पर्यटन १५, साबां ८, गृह विभाग १२.५० व परिवहनसाठी ३ कोटींची तरतूद आहे.राज्याच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करण्यासाठी वित्तमंत्री अजित पवार ३ फेब्रुवारीला बैठक घेणार आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार होईल व आराखड्यात वाढ होण्याची शक्यता आहे. वित्तमंत्र्यांद्वारा जिल्ह्यासह विभागाचा आढावा अमरावती येथील नियोजन भवनात होण्याची शक्यता आहे.जिल्ह्यात यापूर्वीच्या टर्ममधील आमदारांनी सूचविलेली कामे व याबाबतचा निधी ३१ मार्चपर्यंत खर्च करण्याचे आव्हान विविध विभागाच्या शासकीय यंत्रणांसमोर आहे. शासनादेशानुसार आता १५ फेब्रुवारीपासून साहित्य खरेदी करता येणार नाही. त्याचाही फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.पाच मतदारसंघातील नव्या आमदारांच्या निधीमध्ये कपात करण्यात आल्याने त्यांना हात राखूनच खर्च करावा लागेल. पालकमंत्र्यांच्या ३१ जानेवारीच्या आढावा बैठकीत लोकप्रतिनिधी व पदाधिकारी कामांची शिफारस करतील.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व वित्तमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत आराखड्यावर चर्चा होणार आहे.

> शासकीय विभागांना दिलेला निधी मार्चअखेरपर्यंत खर्च होईल. जिल्ह्याच्या प्राथमिक वार्षिक आराखड्याला राज्य बैठकीत मान्यता मिळेल. पुढील आर्थिक वर्षासाठी ४१७ कोटींचा हा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
>
> **– अभिजीत मस्के, जिल्हा नियोजन अधिकारी**

# अमरावती विद्यापीठातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीचा मार्ग मोकळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीवर असलेली स्थगिती उठविण्यात आली आहे. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या स्वाक्षरीने २४ जानेवारी रोजी संस्थाचालक अध्यक्ष, सचिव आणि प्राचार्यांच्या नावे त्या अनुषंगाने पत्र पाठविण्यात आले आहे. आता संस्थाचालकांना त्यांच्या स्तरावर असलेल्या रिक्त पदांना शासनाकडून मान्यता मिळवून रिक्त पदे भरता येणार आहेत.

गत पाच वर्षांपासून महाविद्यालयात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीवर स्थगिती असल्याने कोणतेही पद भरता आले नाही. मात्र राज्यपालांचे प्रधान सचिव यांच्या २६ नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठात पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त पत्राच्या आधारे अमरावती विद्यापीठ कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी रिक्त पदांबाबत पदभरती करता येईल, असे कळविले आहे. त्यामुळे महाविद्यालयांत रिक्त पदांची वाणवा संपणार आहे. अमरावती, अकोला, वाशिम यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्यांतील अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांना हे पत्र पाठविण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्य पदभरतीवर स्थगिती नव्हतीच. आता केवळ राज्य शासनाच्या वित्त विभागाने २०१८ मध्ये पदभरतीला परवानगी दिली होती. त्यात काही वादग्रस्त पदे, न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेली पदे, संस्था अंतर्गत वाद अशी काही पदे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत, ती पदे आता भरता येणार आहेत. सरसकट पदभरती करता येणार नाही, असे राज्यपालांच्या २६ नोव्हेंबर २०२४ च्या पत्रात नमूद आहे, असे विभागाचे उच्च व तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे म्हणाले.

> महाविद्यालयांतील रिक्त पदांचा प्रस्ताव मान्य करून आणण्याची जबाबदारी ही संस्थाचालकांची आहे. शिक्षण सहसंचालक कार्यालय ते पुढे राज्य शासन ही सर्व प्रक्रिया संस्थानाच करावी लागेल.
>
> **– डॉ. अविनाश असनारे, सकुलसचिव, अमरावती विद्यापीठ**

**अमरावती विद्यापीठातील १३ शिक्षक पदभरतीवर स्थगिती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विधानसभा निवडणुकीपूर्वी १३ शिक्षक पदभरतीला मान्यता प्रदान करण्यात आली होती. मात्र, यात काही तांत्रिक बाबींवर आक्षेप घेण्यात आल्यामुळे या १३ शिक्षक पदभरतीवर अद्यापही स्थगिती कायम आहे.

# रहाटगाव स्मशानभूमितच संतप्त नागरिकांचे अर्धनग्न आंदोलन व उपोषण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

स्थानिक रहाटगांव येथील स्मशानभूमिची जागा बळकाविण्याचा प्रयत्न काही लोकांकडून होत असून ही स्मशानभूमी वाचविण्यासाठी स्थानिकांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे.परिसरातील नागरिकांनी एकत्र येत आजपासून समशासनभूमीतच अर्धनग्न आंदोलन व उपोषणाचे हत्यार उपसले आहे.विशेष म्हणजे या आंदोलनात महिलांचा सहभाग ही मोठ्या प्रमाणात आहे.

समशानभूमी साठी वारंवार अर्ज देवून तसेच पुरावे देवून सुद्धा प्रशासनाकडून कुठलीच कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांनी २६ जानेवारीपासून स्मशानभूमीतच उपोषण करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे हा मुद्दा तापणार हे निश्चित होते मात्र प्रशासनाने या कडे लक्ष दिले नाही परिणामी नागरिकांनी आंदोलन पुकारले आहे.रहाटगाव परिसरातील नागरिकांनाअंत्यसंस्कारासाठी दुसरी जागाचनसून गेल्या अनेक दिवसांपासूनही स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच मनपा आयुक्तांकडे केली जात आहे.विशेष म्हणजे स्मशानभूमीच्या बोर्डावर काही लोकांनी नाव मिटविण्याचा प्रयत्न सुद्धा केला आहे. त्यामुळे ही स्मशानभूमी वाचविण्यासाठी आता २६ जानेवारीपासून तेथेच उपोषण करणार असल्याचा इशारा सुभाष चौधरी, रमेश कडू, तुषार पडोळे, उमेश जयस्वाल, राजू पडोळे, गजान रामेकर, राम काकडे, निखील देवघरे, दिलीप रामेकर, दिलीप मंडाळकर, रणजीत दिवे, दादाराव दिवे, अनिल दिवे, दत्ता देवघरे, चंद्रशेखर देवघरे, अनिल खेकाडे, आशीष खेकाडे, चंदू पाथरे, रमेश धामणकर, वामनराव गिरी आदींनी दिला होता.

## वडाळीत भागवत ज्ञानयज्ञ प्रारंभ रक्तदान वृक्ष वाटपासह विविध उपक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

वडाळी येथील श्री इंद्रशेष दरबार संस्थांच्या वतीने रथसप्तमी महोत्सवा निमित्त भागवत ज्ञानयज्ञाला मंगळवार २८ पासून प्रारंभ झाला आहे. या अनुषंगाने सप्ताह भर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

भागवत केसरी ज्ञानेश्वर महाराज वाघ (भैरवगड) यांचे मंगळवार पासून दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत दैनंदिन भागवत कथा प्रवचन होईल. याव्यतिरिक्त या धार्मिक महोत्सवात पहाटे ५ ते ७ काकडा आरती, दुपारी २ ते ६ भागवत कथा प्रवचन तर, सायंकाळी ७ ते ८ या वेळात हरिपाठ व प्रार्थना होईल. ४ फेब्रुवारी रोजी या धार्मिक महोत्वासवाचा समारोप होईल. धार्मिक महोत्त्वासोबतच संस्थांनच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्याचा सुद्धा निर्णय घेण्यात आला. शनिवार १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत रक्तदान शिबिर, रविवार २ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते १ या वेळात नेत्रदान संकल्प जनजागृती मोहीम घेण्यात येईल. सोमवार ३ फेब्रुवारी रोजी भागवत कथा ज्ञान सप्ताहात सहभागी होणाऱ्या व वृक्ष लागवडीचे महत्त्व जोपासनार्यांना रोपांचे वाटप सुद्धा या ठिकाणी केल्या जाईल.

# ५ महिन्यांपासून जयस्तंभ चौक ते तहसील कार्यालय पर्यंत रखडलेल्या कामाला सुरुवात

## विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीचा इम्पॅक्ट! सा.बां.विभागाने घेतली दखल






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदुर बाजार**

गेल्या ५ महिनापांसून रखडलेल्या चांदूर बाजार जयस्तंभ चौक ते तहसील कार्यालय पर्यंत रस्त्याचा कामाला अखेर सुरुवात झाली असून दैनिक विदर्भ प्रजासत्ताक वृत्तपत्रात प्रकाशीत झालेला बातमीची सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेतलीगेल्या ५ महिन्यापासून संबंधित रस्ताचे काम रखडले होते शासनाने ५ कोटी रुपये निधी मंजूर केला होता तर कामाला सुद्धा सुरुवात झाली होती तर कंत्राटदाराच्या व संबंधित अभियंता यांनी केलेल्या दुर्लक्ष मुळे काम थांबले होते रस्त्याच्या कामाला गेल्या पाच महिन्यांपासून सुरुवात झाली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला होता व्यापारी व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता असल्याने नेहमी रहदारी असते रस्त्यावर अनेक कृषी केंद्र, दवाखाने, हार्डवेअर, बँका, ग्रेन मार्केट, कापड दुकाने आदी दुकाने आहेत यामुळे या मार्गावर कायम वर्दळ असते यासह बस स्थानक व पोलीस स्टेशन असल्यामुळे महाविद्यालयातील विध्यार्थी व चिमुकल्यांचा अनेकदा किरकोळ अपघात झाल्याच समोर आले असतांना संबंधित कंत्राटदाराने या कडे दुर्लक्ष केले होते या रस्त्यातून मार्ग काढताना दुचाकी आणि चारचाकी चालकांना तारेवरची कसत करावी लागत होती त्यामुळे दैनंदिन किरकोळ अपघात होत होते तर तात्काळ काम करू करण्यासाठी चांदूर बाजार येथील समाजसेवक वैभव तिखिले यांनी आंदोलनचा इशारा दिला होता व याबाबत परिसरातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन 'विदर्भ प्रजासत्ताक' वृत्तपत्रात याबाबत दी.२१ जानेवारी रोजी बातमी प्रकाशित करत समस्येला वाचा फोडली होती याचीच दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने कामाला सुरवात केली आहे आणि त्यामुळे नागरिक आभार व्यक्त करित आहे.

**कामाला सुरवात पण वाहतुकीला अडथळा!**

सदर रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली असून सुद्धा वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे वाहतूक वाढू नये व अपघात होऊ नये म्हणून चांदूर बाजार पोलीस विभागाने उपाय योजना केल्या पाहिजे रस्त्यावर बस स्थानक असल्यामुळे आगार प्रमुखांनी रस्त्यामध्ये बदल करण्याच्या सूचना सबंधित बस चालकांना दिल्या पाहिजे अशी मागणी नागरिक करित आहे.

# शहरातील भटक्या श्वानांना आवरा? सर्वसामान्यांच्या जिवाला धोका

## प्रशासनाला आवाहन, शहरात भटके श्वान किती? निर्बीजीकरणावर प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

महानगरात भटक्या श्वानांनी अक्षरशः हैदोस घातला असून, नागरिकांना चावा घेण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. भटक्या श्वानांपासून सर्वसामान्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, पिसाळलेल्या श्वानांची संख्यावाढ ही लक्षणीय ठरणारी आहे. अमरावती, बडनेरा या शहरातील नागरिक भटक्या, पिसाळलेल्या श्वानांनी त्रस्त असल्याचे, जागोजागी असे चित्र आहे.

अमरावती महानगरात भटक्या श्वानांचा हैदोस हा गंभीर प्रश्न अतिशय नाजूक वळणावर पोहोचला आहे. रात्री– अपरात्री भटकी श्वान वाटसरू अथवा दुचाकी चालकांना अचानक घेरून हल्ला करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत चालली आहे. सीमेवरील नागरी वस्त्यांच्या भागात नॉनव्हेजचे टाकाऊ पदार्थ, हॉटेल अथवा मंगल कार्यालयातील खाद्यपदार्थ, उघड्यावर अन्न आदी आणून टाकले जात असल्याने ते खाण्यासाठी भटके श्वान त्या भागात येत असल्याचे चित्र आहे. उघड्यावर मांस, टाकाऊ पदार्थ आणून टाकले जात असताना प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही.

भटक्या श्वानांचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. रात्रीच्या सुमारास निर्जनस्थळी, रस्त्यावर संचार करताना आता नागरिकांना भीती वाटू लागली आहे. त्यासाठी पकड मोहीम आवश्यक आहे.

**आकडेवारी**

अमरावती – १०१४६ , धारणी – २३२४ , अंजनगाव – १८३० , अचलपूर – १००३ , मोर्शी – ८३७ , नांदगाव – ६२४ , वरूड – ६०६ , चांदूर रेल्वे – ६०४ , तिवसा – ५८१ , भातकुली – ४०४ , धामणगाव – ३०९ , चुर्णी – ९४

# एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट आक्रमक; मध्यवर्ती बस स्थानका समोर चक्काजाम आंदोलन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा स्थापन झालेल्या महायुती सरकारने एसटी महामंडळाच्या तिकीट दरामध्ये वाढ केली आहे. या निर्णयाविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने राज्यभरात आंदोलन करण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता राज्यातील प्रमुख एसटी डेपोजवळ हे चक्काजाम आंदोलन होणार आहे. याचअनुषंगाने आज जिल्हा प्रमुख पराग गुडधे व मनोज कडु यांच्या नेतृत्वात आज अमरावतीच्या मध्यवर्ती बस स्थानकासमोर चक्का जाम आंदोलन करण्यात आले यावेळी बस स्थानकात बसेस ची प्रचंड गर्दी झाली आहे.

एसटी भाडे वाढीविरोधात ठाकरे गट चांगलाच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. अमरावती मध्ये चक्काजाम आंदोलन करण्यात आले. जिल्ह्याप्रमुख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन झाले.राज्यातील सर्वसामान्य जनतेला एसटी महामंडळाने केलेली भाडेवाढ परवडणारी नाही. दुसरीकडे तुम्ही वायफळ खर्च करत आहात आणि एसटीची भाडे वाढ करता? असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. त्यामुळे एस टी महामंडळाने केलेली भाडेवाढ रद्द करणेच योग्य होईल. नसता ही सर्वसामान्य प्रवाशांवर अन्यायकारक असा हा निर्णय असल्याचे यावेळी जिल्ह्याप्रमुखांनी सांगितले